# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**गुरुवार, दिनांक २७ जून, २०१९ / आषाढ ६, १९४१ ( शके )**

| | |
|---|---|
| (१) वित्त व नियोजन, वने मंत्री<br>(२) ग्रामविकास, महिला व बालविकास मंत्री<br>(३) वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री<br>(४) परिवहन, खारभूमी विकास मंत्री<br>(५) पर्यटन व राजशिष्टाचार मंत्री<br>(६) रोजगार हमी मंत्री<br>(७) विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री<br>(८) जलसंधारण मंत्री | } यांचे प्रभारी विभाग |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७१**

---

### नागपूर शहरातील इंदीरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयात 'मातृ दुग्ध पेढी' विभाग निर्माण करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(१) * १३९०९० श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहारातील इंदीरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयात 'मातृ दुग्ध पेढी' विभाग निर्माण करण्याचा प्रस्ताव मागील दोन वर्षापासुन जागेअभावी प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, "मातृ दुग्ध पेढी"चा उपयोग अपु-या दिवसांच्या बाळांसाठी, आईने सोडून दिलेल्या बाळांसाठी व अतिदक्षता विभागात ठेवलेल्या बाळांसाठी केला जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रस्ताव मेयो रुग्णालयाच्या बालरोग विभागाने तयार केला असुन जागा उपलब्ध नसल्याच्या कारणास्तव मागील दोन वर्षापासुन प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, 'मातृ दुग्ध पेढी' या अतिशय महत्वाच्या प्रकल्पाकरीता जागा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) जागे अभावी विभाग निर्माण करण्यात न आल्याची बाब खरी आहे.

(४) जागा उपलब्ध करून देण्याबाबत संस्था स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देवगड (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील देवगड-गढीताम्हाणे रस्त्याच्या सलग ८.९० कि.मी. अंतराचा नवीन रस्ता तयार करणेबाबत

**(२) * १३६७८३ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवगड (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील देवगड-गढीताम्हाणे इ.जि.मा.क्र.११ या सन १९८१-२००१ रस्ते विकास योजनेत समाविष्ट करण्यात आलेल्या रस्त्याची एकूण लांबी २९ कि.मी. इतकी असून सदरहू रस्त्यावरील आनंदवाडी ते मळई ३.६ कि.मी., मळई शाळा ते वेळवाडी १.१० कि.मी. व पिरवाडी ते

कालवी ४.३० कि.मी.असा एकूण ८.९० कि.मी.चा रस्ताच अस्तित्वात नसल्याने तेथील ग्रामस्थांनी मागील सुमारे २० वर्षांपासून मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग जिल्हा, अधिक्षक अभियंता, रत्नागिरी, सार्वजनिक बांधकाम मंडळ, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कणकवली आदींकडे नवीन रस्ता तयार करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामाचा समावेश कोकण पॅकेजमध्ये करण्यात आला असतानाही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अस्तित्वात नसलेला ८.९० कि.मी. अंतराचा नवीन रस्ता तयार करून देवगड-गढीताम्हाणे सलग रस्त्याचे काम तात्काळ पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अशी बाब आढळून आली नाही.

(३) देवगड आनंदवाडी मार्गे गढीताम्हाणे रस्ता हा रा.मा. क्र. १७८ ते देवगड वाडातर टेंबवली गढीताम्हाणे इतर जिल्हा मार्ग क्र. १५ आहे. या रस्त्याची प्रत्यक्षातील लांबी २६.०० कि.मी. इतकी आहे. त्यापैकी प्रश्नांकित आनंदवाडी ते मळई हे १/२०० ते ४/७०० कि.मी. या लांबीमध्ये तसेच मळई शाळा ते वेळवाडी ५/३०० ते ६/४०० कि.मी. लांबीमध्ये येत असून सदर रस्ता नगर पंचायत देवगड जामसंडे यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे.

उर्वरीत पिरवाडी ते कालवी हा ४.३० कि.मी. रस्ता जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत आहे. जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील रस्ता अस्तित्वात नसून पायवाट स्वरुपाचा आहे. ही जागा आंबा बागायती असल्याने खाजगी जमीन मालकांकडून स्वखुशीने मिळणे आवश्यक आहे. सदर जागा उपलब्ध झाल्यानंतर काम प्रस्तावित करण्याबाबत पुढील कार्यवाही करणे जिल्हा परिषदेला शक्य होणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्हयातील महिला बचत गटांना पोषण आहारासाठी दिल्या जाणाऱ्या धान्यामध्ये कपात केल्याबाबत

**(३) * १३७१६२ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयामध्ये ६०० पेक्षा जास्त बालकांचा कुपोषणाने मृत्यू झाला असतांना शाळांमध्ये पोषण आहारासाठी महिला बचतगटांना दिल्या जाणाऱ्या धान्यामध्ये ६० ते ८० टक्के एवढी कपात केली जात असल्याची बाब दिनांक ३ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारस निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोषण आहारासाठी महिला बचतगटांना होणाऱ्या धान्याच्या पुरवठ्यामध्ये कपात सन २०१६ पासून सुरु असून सन २०१८ मध्ये तांदळात ६१.२० टक्के तर गहू पुरवठ्यामध्ये ७८.२२ टक्के इतकी कपात करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, महिला बचत गटांना शालेय पोषण आहारासाठी योग्य प्रमाणात धान्य पुरविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) पोषण आहारासाठी केंद्र शासनाकडून कमी प्रमाणात नियतन उपलब्ध झाल्यामुळे प्राप्त नियतनानुसार वितरीत करण्यात आले. राज्य शासनाने नियतनामध्ये कोणत्याही प्रकारची कपात केलेली नाही.

पालघर जिल्हयामध्ये मागिल दोन वर्षात खालील प्रमाणे बालमृत्यु झाले आहेत.

| | मृत्यु | |
|---|---|---|
| | २०१७-१८ | २०१८-१९ |
| ० ते ६ बालके | ४६९ | ३४८ |

वरील तक्त्यात दर्शविण्यात आलेले मृत्यू हे कुपोषणाने झाले नसून विविध आजारामुळे / कारणांमुळे झालेले आहेत. उदा.Low Birth, Prematurity, Birth Asphyxia, Aspiration Asphyxia, Septicaemia, Meningitis इत्यादी.

(२) हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाकडून नियतन कमी प्रमाणात उपलब्ध झाल्यामुळे कमी प्रमाणात नियतन वितरीत करण्यात आले. राज्य शासनाने नियतनामध्ये कोणत्याही प्रकारची कपात केलेली नाही. तथापि माहे जानेवारी २०१९ ते मार्च २०१९ या कालावधीसाठी केंद्र शासनाकडून अतिरिक्त नियतन प्राप्त झाल्यामुळे माहे जानेवारी २०१९ ते मार्च २०१९ या कालावधीकरिता मागणीप्रमाणे पालघर जिल्हयाचे नियतन मंजूर करण्यात आलेले आहे. सन २०१९-२० (माहे एप्रिल २०१९ ते मार्च २०२०) या कालावधीसाठी लाभार्थी संख्या व प्रति लाभार्थी साठी लागणारे नियतन याचा पूर्ण विचार करुन परिपूर्ण नियतनाची मागणी करण्यात आलेली आहे. त्यानुसार केंद्र शासनाकडून ज्याप्रमाणात नियतन प्राप्त होईल, त्याप्रमाणात जिल्हा स्तरावर नियतन वितरीत करण्यात येईल. नियतन कमी पडू नये यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) व (४) पूरक पोषणाकरीता लागणारे नियतन व केंद्र शासनाकडून प्राप्त होणारे नियतन विचारात घेवून केंद्र शासनाकडे अतिरिक्त धान्याची मागणी नोंदविण्यात आलेली आहे. केंद्र शासनाकडे आवश्यक तेवढया धान्याकरीता नियतनाची मागणी केलेली असून राज्याच्या मागणी प्रमाणे केंद्र शासनाकडून माहे एप्रिल २०१९ ते सप्टेंबर २०१९ या कालावधीसाठी आवश्यक तेवढे नियतन प्राप्त झालेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील म्हैसाळ उपसा सिंचन योजनेतून वगळलेल्या गावांचा समावेश करणेबाबत

**(४) * १४०५८९ श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील दक्षिण भागासाठी म्हैसाळ उपसा सिंचन योजनेतून वगळलेली लवंगी, आसबेवडी, शिवनगी, सोड्डी, सलगर बु॥, सलगर खुर्द व येळगी या सात गावांचा नव्याने योजनेमध्ये समावेश करण्याचे आदेश मा.जलसंपदा राज्यमंत्री यांनी दिनांक १ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने सदर गावे नव्याने या योजनेमध्ये समाविष्ट करणेबाबत सर्व्हेक्षण करून अहवाल सादर केला आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार या सिंचन योजनेमध्ये सदरहू गावांचा समावेश करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

सदर सात गावांपैकी सलगरे (खु) व सलगर बु ॥ हि दोन गांवे म्हैसाळ योजनेत समाविष्ट आहेत. मा.राज्यमंत्री (जलसंपदा व जलसंधारण) यांनी दि.२७/०२/२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये उर्वरित ५ गावांचा समावेश करता येणे शक्य आहे किंवा कसे याबाबत प्राथमिक सर्व्हेक्षण करण्याच्या सूचना दिल्या आहेत.
(२) प्राथमिक सर्व्हेक्षणची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.
(३) सर्व्हेक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पाथरज (ता.कर्जत, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीत बेकायदेशीररित्या रस्त्याचे काम केल्याबाबत

**(५) * १३९५०२ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाथरज (ता.कर्जत, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीत वन विभागाची परवानगी न घेता कंत्राटदारांनी मोरेवाडी ते गावंडवाडी रस्ता करण्याचे काम सुरू केले असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन विभागाची परवानगी न घेता सदर रस्त्याच्या कामासाठी आदीवासी विकास विभागाच्या पेण येथील एकात्मिक प्रकल्प कार्यालयातून १० लाख रूपयाचा निधी मंजूर करण्यात आला असून वन विभागाच्या अधिका-यांच्या दुर्लक्षितेमुळे कंत्राटदारामार्फत सदर बेकायदेशीर रस्त्याचे काम सुरू असल्याने शासनाच्या निधीचा गैरवापर होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार वन विभागाची परवानगी न घेता शासनाच्या निधीचा दुरूपयोग करून बेकायदेशीररित्या रस्त्याचे काम करणाऱ्या संबधीत कंत्राटदारावर व वन विभागाच्या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) मोरेवाडी ते गावंडवाडी हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.११६ असून या रस्त्याच्या सा.क्र.२/४०० ते ३/०० या अस्तित्वात नसलेल्या लांबीमध्ये खाजगीरीत्या काम करण्यात आल्याचे दिसून आले आहे.
(२) प्रश्नांकित रस्त्याचे काम आदिवासी विकास विभाग, जिल्हा परिषद तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडील कोणत्याही योजनेतून मंजूर नाही.
(३) व (४) मोरेवाडी ते गावंडवाडी या रस्त्याच्या सा.क्र.२/४०० ते ३/०० या अस्तित्वात नसलेल्या लांबीमध्ये खाजगीरीत्या काम करण्यात आल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची सखोल चौकशी करुन शासनास अहवाल सादर करणेबाबत उपायुक्त (विकास), कोकण भवन, नवी मुंबई यांना निर्देश देण्यात आले आहेत.

-----------------

## कवठे यमाई (ता.शिरूर, जि.पुणे) येथील यमाई देवी ते माळवदेव वस्ती या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(६) * १४१४६१ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कवठे यमाई (ता.शिरूर, जि.पुणे) येथील यमाई देवी ते माळवदेव वस्ती या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याची तक्रार नागरिकांनी उपअभियंता, जिल्हा परिषद उपविभाग, शिरूर यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याच्या कामात बारीक खडी व कमी डांबर टाकल्यामुळे या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून काही ठिकाणी रस्त्याची दुरवस्था झाली असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) प्राप्त केलेल्या अहवालांनुसार, हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आंबडोस (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) येथील वहाळवाडी ते रवळनाथ मंदिरापर्यंत जोडरस्ता व पुलाचे बांधकाम करणेबाबत

**(७) * १४१७१८ श्री.संजय कदम (दापोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंबडोस (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) येथील वहाळवाडी ते रवळनाथ मंदिरापर्यंतचा जोडरस्ता व पुलाचे बांधकाम करण्याकरीता ग्रामस्थांनी वारंवार मा.ग्रामविकास मंत्री व राज्यमंत्री, सचिव, ग्रामविकास विभाग तसेच जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांना निवेदने देण्यात येऊनही अद्यापी सदरहू रस्त्याचे व पुलाचे काम करण्यात आले नसल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, या मंदिरापर्यंत जाणारा रस्ता जंगलातून जात असुन तेथे हिंस्त्र प्राण्यांचा वावर असल्याने भाविकांना मंदिरापर्यंत जाण्यास धोका उत्पन्न होऊ शकत असल्याने याठिकाणी पक्का रस्ता बांधण्याबाबत व वहाळ (नाला) यावर पावसाळयात पाणी साठत असल्यामुळे याठिकाणी पूल बांधण्यात यावा अशी मागणी आंबडोस वहाळवाडी उत्कर्ष मंडळाने दिनांक ३ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सिंधुदूर्ग यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याठिकाणी पक्का रस्ता होण्यासाठी तेथील ग्रामस्थांनी सुमारे ४ वर्षापूर्वी स्वत:च्या जमिनी दिल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आंबडोस येथील वहाळवाडी ते रवळनाथ मंदिरांपर्यंत पक्का रस्ता व वहाळ (नाला) यावर पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) याबाबत दि.०३ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास केलेली मागणी पत्र जिल्हा परिषदेकडे आढळून येत नाही.

(३) जि. प. बांधकाम विभागाकडे रस्त्याचे काम करणेसाठी जमिन उपलब्ध करुन दिलेली नाही.

(४) प्रश्नाधिन रस्त्याचे वा पुलाचे बांधकाम करणेसाठी मोठया प्रमाणात निधीची आवश्यता आहे. तसेच पुल बांधण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन राबविले जात असल्याने सदरचे काम सा.बां. विभागाकडुन प्रस्तावित करणेसाठी जिल्हा परिषदेने पत्र क्र.सिंजिप/बांधकाम/प्रशा. ३/१४०८/०१७ दि.११/०७/२०१७ अन्वये कळविण्यात आलेले आहे. तसेच रस्त्याच्या कामासाठी जि.प. कडे उपलब्ध होणाऱ्या जिल्हा वार्षिक योजना, रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रम इत्यादीमधुन निधीच्या उपलब्धतेनुसार टप्या-टप्याने प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## बोरगाव (लिंगा) (ता.नेर, जि.यवतमाळ) येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत झालेला गैरव्यवहार

**(८) * १४१९१६ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरगाव (लिंगा) (ता.नेर, जि.यवतमाळ) येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत घरकुल बांधकामात मिळणारी अकुशल मजुरीची रक्कम व शौचालय बांधकामात मिळणारी अकुशल मजुरीची रक्कम बनावट मजुराना देऊन प्रत्यक्षात काम करणाऱ्या मजुरांना मजुरी देण्यात आली नसल्याची तक्रार येथील मजुरांनी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेकडे दिनांक २ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास करुनसुध्दा याप्रकरणी कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार प्रत्यक्ष काम करणाऱ्या मजुरांना मजूरी देण्यासह बनावट मजुरांना मजूरी देणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयदत्त क्षीरसागर :** (१) हे खरे नाही. तथापि, दिनांक ०४/०६/२०१८ अन्वये व दिनांक ११/०६/२०१८ अन्वये तक्रार प्राप्त झाली आहे. त्या अनुषंगाने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, राळेगाव यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमुन चौकशी करण्यात आली आहे.

(२) सदर प्रकरणी चौकशी समितीने दिलेल्या अहवालानुसार घरकुलाच्या व वैयक्तिक शौचालयाच्या कामावर हजर असलेल्या मजुरांचे लाभार्थ्यासहीत खात्यावर त्यांनी केलेल्या कामाची मजुरी अदा करण्यात आली आहे.

(३) सदर प्रकरणी कामावर उपस्थित असणाऱ्या मजुरांच्याच खात्यात मजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे सदर प्रकरणी कोणीही दोषी असल्याचे आढळुन आले नाही. त्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बागलाण (जि.नाशिक) तालुक्यातील शेतकऱ्यांना शेततळयाच्या अस्तरीकरणासाठी अनुदान मिळण्याबाबत

**(९) * १४०५१२ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बागलाण (जि.नाशिक) तालुक्यातील शेतकऱ्यांनी "मागेल त्याला शेततळे" या योजनेतून शेततळयाचे खोदकाम केले असून शेततळ्याच्या अस्तरीकरणासाठी ७७५ शेतकऱ्यांनी अनुदान मिळण्याबाबत अर्ज केले असताना आतापर्यंत फक्त ८१ शेतकऱ्यांनाच अनुदान देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उर्वरीत शेतकऱ्यांना शेततळ्याच्या अस्तरीकरणाचे अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयदत्त क्षीरसागर :** (१) अशंतः खरे आहे. बागलाण तालुक्यात "मागेल त्याला शेततळे" योजनेंतर्गत आतापर्यंत १०५३ शेततळयांचे खोदकाम पूर्ण झालेले आहे. त्यानुसार २०१८-१९ मध्ये राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत शेततळे अस्तरीकरणासाठी ७१५ शेतक-यांनी अर्ज केले होते. अस्तरीकरणासाठी बागलाण तालुक्यास प्राप्त लक्षांकानुसार मागील ३ वर्षात एकूण ९० शेततळ्यांना अस्तरीकरण करीता अनुदान देण्यात आलेले आहे.

(२) सन २०१९-२० मध्ये अस्तरीकरण योजनेसाठी हॉर्टनेट या ऑनलाईन प्रणालीवर अर्ज मागविण्यात आलेले आहेत. प्राप्त होणा-या भौतिक व आर्थिक लक्षांकाच्या अधिन राहून शेतक-यांना देय अनुदान देण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## निळवंडे (ता.अकोले, जि.अहमदनगर) प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या व कालवाग्रस्त शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत

**(१०) * १३५४६९ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निळवंडे (ता.अकोले, जि.अहमदनगर) प्रकल्पग्रस्त कृती समिती व कालवाग्रस्त कृती समिती, अकोले (जि.अहमदनगर) यांनी निळवंडे प्रकल्पग्रस्तांच्या विविध मागण्यांबाबतचे लेखी निवेदन मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निळवंडे प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, सदर निवेदनानुसार उक्त मागण्या पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.
(२) निळवंडे प्रकल्पग्रस्त कृती समिती व कालवाग्रस्त कृती समिती, अकोले जि.अहमदनगर यांनी निळवंडे प्रकल्पग्रस्तांच्या विविध मागण्यांबाबतचे स्वरूप प्रामुख्याने खालील प्रमाणे आहे.

१) निळवंडे धरणाचे मुख्य कालवे बंदिस्त पाईपलाईनने करणे.

२) प्रकल्पग्रस्तांना भुसंपादन वाढीव मोबदला, नोकरी, जमिनीचे सपाटीकरण, शेतीसाठी व घरांसाठी विद्युत जोडणी, पुनर्वसनाचे फायदे, शंकरराव काळे समितीच्या अहवालाची अंमलबजावणी करणे व मूलभूत नागरी सुविधा पुरविणे

३) भंडारदरा धरणाचे पाणी परवाने रद्द करू नये.

४) प्रस्तावित व बंद असलेल्या उपसा सिंचन योजना त्वरीत सुरू करणे.

५) म्हाळादेवी जलसेतुचे काम पुर्ण करणे.

६) पश्चिमेकडिल पाणी पूर्वेकडे गोदावरी खो-यामध्ये वळविणे.

७) राजुर पिंपरकणे पूलाचे काम तातडीने सुरु करणे व इतर मागण्या आहेत.

(३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत क्षेत्रीय स्तरावरुन निळवंडे कालवाग्रस्त कृती समितीस कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बळेगांव (ता.नायगांव, जि.नांदेड) बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(११) * १३९७१४ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बळेगांव (ता.नायगांव, जि.नांदेड) बंधा-याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने बंधा-याचे कठडे फुटून १०० मीटर बाजुला सरकले असून कठडयाच्या गजाळया देखील उघडया पडल्या आहेत अशा परिस्थीतीत येत्या काळात बंधाराही कोसळण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधा-याच्या निकृष्ट बांधकामाची तसेच निकृष्ट बांधकाम करण्यास सहाय्य करणाऱ्या अधिका-यांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरीक व संघटनेने केली असल्याचे दिनांक १४ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही. बंधाऱ्याचे कठडे (Railing) सुरक्षीत असून कठड्याच्या गजाळ्या (Reinforcement) उघड्या पडल्या नाहीत. बंधाऱ्याचे काम समाधानकारक झाले असून बंधा-यात सन २०१५ पासुन पाणीसाठा करुन सुमारे २००० हेक्टर सिंचन करण्यात येत आहे. तथापी बंधाऱ्याच्या खालील बाजुस खडकाची झीज झाल्याने अंत्यभिंतीचा कांही भाग पडला आहे. त्याची तातडीने दुरुस्ती करण्यात येत आहे, त्यामुळे बंधारा कोसळण्याची शक्यता नाही.

(२) हे खरे नाही, अशा प्रकारची मागणी अद्याप कोणत्याही संघटनेने किंवा नागरीकांनी केली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळकोट (जि.लातूर) येथे स्वतंत्र बस आगार मंजूर करणेबाबत

**(१२) * १३६७५९ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळकोट (जि.लातूर) येथील बसस्थानकावर खान-पानाची व्यवस्था नसुन येथील स्वच्छतागृहाची अवस्था दयनीय झाली असुन इतरही मुलभूत सुविधांच्या अभावामुळे महिला, पुरुष, शाळकरी मुली, मुले, व्यापारी आदींना या बसस्थानकात अनेक गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळकोट तालुका निर्माण होवून २० वर्ष होवूनही या तालुक्यात अद्याप ४८ गांवापैकी निम्याहून अधिक गावात अद्यापर्यंत बससेवा उपलब्ध नसल्यामुळे या तालुक्यातील नागरीकांना अवैध प्रवासी वाहतुकीने प्रवास करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथील नागरीकांना दळण वळणासाठी शासकीय साधन उपलब्ध करून दयावे व या तालुक्यासाठी स्वतंत्र बस आगार व नवीन बसेस उपलब्ध करून द्यावे यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान राज्य शासनाकडे मागणी केली असून स्वतंत्र बस आगार स्थापन करण्याबाबत मा.राज्यमंत्री यांच्य दालनात माहे मे, २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात बैठक आयोजित करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जळकोट तालुक्यासाठी सर्व ससोयीसुविधांयुक्त स्वतंत्र बस आगार व नविन बसेस उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही.

जळकोट बस्थानकावर सुमारे २१९ चौ. फुट क्षेत्रफळाचा बांधीव गाळा स्नॅकबारसाठी उपलब्ध असून, त्यासाठी अनेकवेळा निविदा काढूनसुध्दा प्रतिसाद मिळालेला नाही. सदर बसस्थानकात प्रवाशांकरिता आवश्यक मुलभूत सोयी सुविधा व स्वच्छतागृह उपलब्ध असून, ते सुस्थितीत आहे. तसेच, प्रवाशांकरिता सुसज्ज असे बांधीव बसस्थानक उपलब्ध असून, बसस्थानकाचे डांबरीकरण व कुंपण भिंत सुस्थितीत आहे.

(२) हे खरे नाही.

जळकोट तालुक्यातील ४८ पैकी ४० गावांना लातूर विभागामार्फत बससेवा उपलब्ध आहे. उर्वरित ८ गावांपैकी डोमगांव, शेलदरा, वडगांव, सोरगा, करंजी या पाच गावांना जाण्यासाठी असलेल्या मार्गाची तपासणी केली असता, वाहतुकीसाठी जागेची अडचण आहे. तर कोनाळी डोंगर, चिंचोली, मरसांगवी या ३ गावांचे रस्ते वाहतुकीस योग्य आहेत. त्यापैकी चिंचोली गावाला बससेवा सुरु असून कोनाळी डोंगर व मरसांगवी या गावांना प्रवासी मागणी नसल्यामुळे वाहतूक सुरु करण्यात आली नाही.

(३) होय.

(४) मुखेड आगाराची सरासरी नियते ५५ असून जळकोट शहरापासून मुखेड आगार २४.८ कि.मी. अंतरावर आहे. राज्य परिवहन महामंडळाच्या आगार निर्मितीच्या धोरणानुसार एखादया आगाराची नियते १०० पेक्षा अधिक नसल्यास ३० कि.मी. अंतराच्या आत नविन आगार मंजूर करु नये अशी तरतूद आहे. त्यामुळे जळकोट येथे नविन आगाराची आवश्यकता नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिखलगाव वरची जडयारवाडी (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील धरणासाठी संपादीत केलेल्या जमिनीचा मोबदला अदा करणेबाबत

**(१३) * १३६००७ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखलगाव वरची जडयारवाडी (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे लघुपाटबंधारे विभागामार्फत बांधण्यात येत असलेल्या धरणामध्ये बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्त शेतक-यांना अदयापपर्यंत मोबदला मिळालेला नसल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पग्रस्त शेतक-यांना जो पर्यत मोबदला मिळत नाही तोपर्यंत काम होऊ देणार नाही असे शेतक-यांनी घोषित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व तदनुसार प्रकल्पग्रस्त शेतक-यांना तात्काळ मोबदला अदा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजीराव सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशतः खरे आहे.

(३) सदर योजनेचे काम पूर्ण करण्यासाठी मौजे चिखलगाव, मौजे सौंदळ व मौजे कोंडवाडी या गावांतील जमिन संपादीत करणे आवश्यक आहे.

मौजे सौंदळ व मौजे कोंडवाडी येथील संयुक्त मोजणीसाठी तारीख निश्चित करण्यात आली होती. परंतू संबंधित शेतकऱ्यांनी जमिनीचा, फळझाडांचा व वनझाडांचा मोबदला किती याबाबत खुलासा झाल्याशिवाय मोजणी करण्यात येवू नये असा जबाब दिला असून मोजणीस विरोध केला आहे. त्यामुळे भूसंपादन प्रकिया पूर्ण करुन शेतकऱ्यांना मोबदला देणे शक्य झालेले नाही.

प्रस्तूत प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या असून भूसंपादनाची कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माण व खटाव (जि.सातारा) तालुक्यात टेंभू व जिहे-कठापूर उपसा सिंचन योजना राबविण्याबाबत

**(१४) * १४२२३२ श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील कुकुडवाडसह १५ आणि खटाव तालुक्यातील मायणीसह १७ अशा एकूण ३२ गावांना टेंभू योजेनेचे पाणी शेतीसाठी मिळावे अशी मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक ८ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाटाव व माण तालुक्यातील काही गावे उरमोडी योजनेच्या लाभक्षेत्रात आली असून आता जिहे-कठापूर योजनेचे पाणी आंध्रा धरणात आणून पुढे उत्तर माणमधील ३५ गावांना पाणी देण्यासाठी योजना मंजूर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार टेंभूचे पाणी कालव्याऐवजी बंदिस्त नलिकेतून देण्याचे नियोजन करण्यासह जिहे-कठापूराची योजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) जिहे-कठापूर उपसा सिंचन योजनेचे पाणी आंधळी धरणात आणून पुढे उत्तर माणमधील ३५ गावांना पाणी देण्यासाठीचा दि.१३/०५/२०१९ रोजीचा महामंडळाचा प्रस्ताव शासनास दि.०४/०६/२०१९ रोजी प्राप्त झाला आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या तपासणीधीन आहे. तसेच सविस्तर सर्व्हेक्षणास महामंडळाने दि.२९/०३/२०१९ च्या पत्रान्वये तत्वत: मान्यता दिली असून सर्वेक्षणाची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

(३) टेंभू योजनेबाबतचे सर्वेक्षण प्रगतीत आहे. जिहे-कठापूर उपसा सिंचन योजना मार्गी लावण्याकरिता योजनेच्या सुधारित प्रकल्प अहवालास शासन निर्णय दि.०६/११/२०१७ अन्वये रु.१,०८५.५३ कोटीची मान्यता दिली आहे. तसेच, मागील तीन वर्षात रु.११२.३७ कोटी निधी उपलब्ध करुन दिला असून,त्यातून योजनेची कामे प्रगतीत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील विक्रोळी व घाटकोपर येथे एकच टीसी क्रमांक वापरुन दुचाकींची विक्री केल्याबाबत

**(१५) * १३७९०९ श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विक्रोळी व घाटकोपर येथे एकच टीसी क्रमांक वापरुन ३३० दुचाकींची विक्री केल्याचे दिनाक १६ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमसास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी मेसर्स अर्चना मोटर्स व इतर सब डिलर्स यांच्यावर शासनाची फसवणूक केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह भविष्यात असे प्रकार रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) अशा आशयाची बातमी दि.३० मार्च २०१९ रोजी वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) मे.अर्चना मोटर्स या नावाने प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई (पूर्व) या कार्यालयाच्या अभिलेखावर अधिकृत वाहन विक्रेता म्हणून नोंद नाही. तसेच उक्त अनधिकृत वाहन विक्रेत्यास व्यवसाय प्रमाणपत्र जारी करण्यात आलेले नाही. यासंदर्भात प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई (पूर्व) यांनी दि.०३.०५.२०१९ रोजीच्या पत्रान्वये त्यांच्या कार्यक्षेत्रातील अधिकृत वाहन वितरकांना केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ अंतर्गत विहित नियमांचे पालन करण्याविषयी आणि कोणत्याही अनधिकृत वाहन विक्रेत्याला विक्री करीता उपलब्ध वाहने ताब्यात देवू नयेत, अशा सूचना जारी केल्या आहेत.

तसेच मेसर्स अर्चना मोटर्स व इतर यांच्यावर प्रथम खबरी अहवाल क्र.१२१/२०१९ दिनांक २६.०३.२०१९ नुसार विक्रोळी वाहतुक पोलीस विभागाकडून फिर्यादीअंती पंतनगर पोलीस ठाणे, मुंबई येथे गुन्हा दाखल झाला असून सदर प्रकरण अन्वेषणाधिन आहे. अनधिकृत वाहन विक्रेतांमार्फत वाहन विक्री झाल्यास संबंधितांवर कडक कारवाई करावी असे शासनाने आदेश दिलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे व पालघर जिल्ह्यात कांदळवनाची अवैधरित्या तोड करुन मातीचा भराव केल्याबाबत

**(१६) * १३४९२५ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) येथील पाचूबंदरातील पाणथळ जागेतील कांदळवनांची तोड करुन त्या ठिकाणी अवैधरित्या भराव केल्याप्रकरणी संबंधीतांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निर्देश वसईचे प्रांताधिकारी यांनी मंडळ अधिकारी, वसई यांना देऊनसुध्दा संबंधितांविरुध्द माहे मार्च, २०१९ पर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच, नायगाव (ता.वसई, जि.पालघर) येथील पश्चिमेला रेल्वे स्थानकाजवळ असलेल्या कांदळवनात शासकीय जमीनीवर असलेल्या तिवरांच्या झाडांची तोड करुन त्या ठिकाणी मातीचा भरावा करुन बेकायदा वाहनतळ उभारले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, ठाणे जिल्हयातील खाडी किनारी असलेल्या कांदळवनाची तोड करुन हजारो एकर जमिनीवर विकासकांनी घरे व चाळी उभारलेल्या असल्याचे सेटलाईट मेपिंगचा दाखला देत कांदळवनाची तोड करणाऱ्यांवर

गुन्हा दाखल करण्यची मागणी विभागीय कोकण आयुक्त, सचिव, महसूल व पर्यावरण विभाग यांच्याकडे सामाजिक कार्यकर्ते यांनी माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, तद्नुसार ठाणे व पालघर जिल्ह्यातील कांदळवनाची अवैधरित्या तोड करणाऱ्या संबंधितावर कारवाई करण्यासह पर्यावरणाचे संतुलन राखण्यास उपयुक्त असलेले कांदळवनाचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) वसई तालुक्यातील मौजे मालोंडे (पाचुबंदर) येथील स.नं ८०-अ या सरकारी खाजण जागवेरील तिवरांच्या झाडांची तोड होऊन माती भराव केल्याप्रकरणी उप विभागीय अधिकारी, वसई यांनी मंडळ अधिकारी, वसई यांना पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ मधील तरतुदीनुसार संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याबाबत दिनांक २६.०२.२०१९ रोजीच्या पत्रान्वये निर्देश दिलेले होते.

मंडळ अधिकारी, वसई यांनी कांदळवन तोड करुन माती भराव केल्याप्रकरणी श्री.नाझरेथ पास्कू पाटील यांचे विरुध्द वसई पोलीस स्टेशन येथे दिनांक १५.०३.२०१९ रोजी गुन्हा दाखल केलेला आहे.

(२) हे खरे नाही.

याबाबत, उप अधिक्षक भूमि अभिलेख, वसई यांच्यामार्फत मोजणी केली असता सदरहू वाहनतळ रेल्वेच्या जागेत आहे.

(३) हे खरे नाही.

याबाबत, विभागीय आयुक्त, कोंकण तसेच महसूल व पर्यावरण विभागाकडे कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) राज्यातील तटीय क्षेत्रातील कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन करण्याकरिता सन २०१२ मध्ये तत्कालीन मुख्य वनसंरक्षक या दर्जाच्या अधिकारी यांच्या अधिपत्याखाली ३७ कर्मचाऱ्यांसह कांदळवन कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे.

राज्यातील सागर तटीय जिल्ह्यांमधील कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली सनियंत्रण समिती गठीत करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा व मोताळा (जि.बुलढाणा) तालुक्यातील पुराचा धोका असलेल्या गावांना पूर संरक्षण भिंत बांधण्याबाबत

**(१७) * १३५०४५ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील राजूर, रोहिंनखेड, गुळभेली, धामणगाव बढे, रिधोरा, टेंभी, जहागिरपुर, कोथळी, जयपुर, लोणघाट, शेलापूर, (ता.मोताळा) तसेच देऊळघाट, हातेडी, तांदुळवाडी, कोलवड, नांद्रा कोळी, सागवान येळगाव (ता.बुलढाणा) या गावांना पुराचा धोका असल्याने तेथे पूर संरक्षण भिंत बांधण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३१ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास मा.जलसंपदा मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने या गावांची पाहणी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार बुलढाणा व मोताळा तालुक्यातील उपरोक्त गावांमध्ये पूर संरक्षण भिंत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही.

(२) सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हा नियोजन समितीच्या निधीमधून शेलापूर, धामणगाव बढे व कोथळी या गावांच्या पूरसंरक्षक भिंतीची कामे पूर्ण केलेली आहेत.

(३) व (४) उर्वरित कामांना जिल्हा नियोजन समितीमार्फत प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर व निधी उपलब्ध झाल्यावर उर्वरित कामे करण्यात येतील.

-----------------

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने दिलेले ईआरपी (एंटरप्राईझ रिसोर्स प्लॅनिंग) कंत्राट नियमबाहय असल्याबाबत

**(१८) * १३८११० श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने ८८ कोटी रुपयाचे ईआरपी (एंटरप्राईझ रिसोर्स प्लॅनिंग) कंत्राट नियमबाहय रित्या दिले असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सविस्तर प्रकल्प अहवाल आणि अंतिम मंजुरी अहवालाविनाच हे कंत्राट देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार कंत्राट देणाऱ्या संबधितांवर कारवाई करण्यासह सदरहू कंत्राटाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) राज्य परिवहन महामंडळाच्या विविध खात्याच्या संगणकीकरणासाठी शासकीय नियमानुसार ई-निविदा प्रक्रिया राबवण्यात आली असून, शासनाच्या पटलावर असणाऱ्या माहिती व तंत्रज्ञान सल्लागार मे.केपीएमजी या संस्थेकडून त्याची संपूर्ण तपासणी करुन व महामंडळाच्या संचालक मंडळाची मान्यता घेवून नियमानुसारच ईआरपी (एटंरप्राईस रिसोर्स प्लॅनिंग) कंत्राट मे.रोल्टा इंडिया लि. यांना देण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

राज्य परिवहन महामंडळाच्या संगणकीकरणासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक संस्था पुणे यांचेकडून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून, त्यास महामंडळाने ठरावाद्वारे संचालक मंडळाची मान्यता घेवून मे.रोल्टा इंडिया लि.यांना कार्यादेश देण्यात आला होता.

(३) व (४) नियमबाह्य कंत्राट दिले नसल्यामुळे, तसेच सविस्तर प्रकल्प अहवालास संचालक मंडळाच्या मंजूरीनंतर कंत्राट दिल्याने चौकशीचा व कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही. परंतू, विनंती प्रस्ताव पत्रिका व कार्यादेशानुसार कंपनीने कार्यवाही न केल्याने कार्यादेश रद्द करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्हयातील खारेपाट भागातील खारभूमी क्षेत्रातील नापिकी क्षेत्राचे सर्व्हेक्षण झाले नसल्याबाबत

**(१९) * १३७९९९ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **खारभूमी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील खारभूमी क्षेत्रातील नापिक क्षेत्राचे सर्व्हेक्षण करण्याचे निदेश रायगड जिल्ह्याचे तत्कालीन पालकमंत्री यांनी रायगड जिल्हा नियोजन समितीच्या दिनांक ५ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत दिले असून तीन वर्षाचा कालावधी होवून सुध्दा खारभूमी क्षेत्रातील नापिकी क्षेत्राचे सर्व्हेक्षण अद्याप करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खारेपाट भागातील नापीक क्षेत्राची अधिकृत माहिती महसूल, कृषी, खारभूमी, सांखिकी व नियोजन या शासकीय विभागांकडे उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर माहिती राज्य शासनाकडे उपलब्ध न झाल्याने येथील जमिनी गेल्या ३० वर्षांपासून नापीक असूनही आजतागायत या भागात दुष्काळ जाहीर होऊ शकला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रायगड जिल्हयातील खारेपाट भागातील नापिकी क्षेत्राचे सर्व्हेक्षण न करणाऱ्या संबधितावर कारवाई करण्यासह त्या भागातील खारभूमी क्षेत्रातील नापिकी क्षेत्राचे सर्व्हेक्षण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

अलिबाग तालुक्यातील ४० गावांचे ५६०१ शेतकऱ्यांचे ३०६७ हेक्टर, उरण तालुक्यातील १२ गावांचे २४४२ शेतकऱ्यांचे ६०५ हेक्टर क्षेत्र, पेण तालुक्यातील १३ गावांचे ७१८ शेतकऱ्यांचे ३५७.०० हे. आर क्षेत्र असे एकूण ४०२९ हेक्टर क्षेत्राचे खारेपाणी शिरुन नुकसान झाले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## संत मुक्ताई मंदिर, कोथळी (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) येथील तिर्थक्षेत्राच्या विकास आराखड्यास निधी देण्याबाबत

**(२०) * १४१३१५ श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संत मुक्ताई मंदिर, कोथळी (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) येथील तीर्थक्षेत्राच्या विकास आराखड्यातील दुसऱ्या टप्प्यातील कामांना मंजूरी देवुन उर्वरित निधी उपलब्ध करुन देण्याबाबत दिनांक ११ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ मे, २०१९ रोजी निवेदन देवुन सत्वर कार्यवाही करण्याबाबत विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त तीर्थक्षेत्रास उर्वरीत निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) खरे आहे.

(३) ग्रामविकास विभागाच्या दि.२८ मार्च, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये श्री संत मुक्ताई मंदिर, कोथळी, ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव या तीर्थक्षेत्राच्या विकास आराखडयातील रु.२५.०० कोटी रकमेच्या कामांना तत्वतः मान्यता दिलेली आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यात रु.९०८.६७ लक्ष किंमतीच्या कामांच्या प्रस्तावास व खर्चास मान्यता देऊन रु.४.०० कोटी निधी जिल्हाधिकारी, जळगांव यांना वितरीत करण्यात आलेला आहे.

तसेच सदर तीर्थक्षेत्राचे ठिकाणी करावयाच्या विकास कामांचा आराखडा उर्वरित रकमेच्या मर्यादेत जिल्हाधिकारी, जळगांव यांच्याकडून मागविण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयात विशेष घटक योजनेतून बांधण्यात आलेल्या साकव कामात झालेला गैरव्यवहार

**(२१) * १४१३७७ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात विशेष घटक योजनेतून बांधण्यात आलेल्या साकव कामात गैरव्यवहार झाल्याप्रकरणी चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त चौकशी अहवालाच्या अनुषंगाने दोषींवर कारवाई करण्यासह साकवासाठी खर्च केलेली १८ कोटी ७५ लाखांची रक्कम सबंधिताकडून वसूल करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) होय.

(२) प्रस्तुत प्रकरणी चौकशी करीता त्रिसदस्यीय समिती नेमण्यात आलेली आहे. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील कल्याण पंचायत समिती मधील पिंपरी ग्रामपंचायतीच्या ग्रामविकास अधिकारी यांनी केलेला गैरव्यवहार

**(२२) * १३७५७३ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील कल्याण पंचायत समिती मधील पिंपरी ग्रामपंचायतीच्या ग्रामविकास अधिकारी यांनी अनधिकृत घरांना घरपट्टी आकारणी करून तसेच इतर विकास कामात व बनावट पेट्रोल, डीझेलची देयके दाखवून गैरव्यवहार केल्या प्रकरणी सरपंच व सदस्य यांनी १०० ते १२५ नागरिकांच्या स्वाक्षरीचे निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा

परिषद, ठाणे व विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार गैरव्यवहार करणाऱ्या संबधित ग्रामविकास अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) व (३) संबंधित ग्रामविकास अधिकारी यांनी भ्रष्टाचार केलेला नसल्याचे आढळून आले आहे तथापि त्यांनी कर्तव्यात कसूर व हलगर्जीपणा केल्याने त्यांच्या विरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधील नियम ४ (१) नुसार “ठपका” ठेवण्याची शिक्षा दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे, सोलापूर, सातारा, सांगली, उस्मानाबाद व बीड या जिल्हयात कृष्णा-भीमा स्थिरीकरण योजना राबविण्याबाबत

**(२३) * १३५५८८ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे, सोलापूर, सातारा, सांगली, उस्मानाबाद व बीड या ६ जिल्हयांत कृष्णा-भीमा स्थिरीकरण योजना प्रस्तावित असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेमुळे ३१ तालुक्यातील १४ लाख हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जिल्हयांत प्रस्तावित असलेली कृष्णा-भीमा स्थिरीकरण योजना तात्काळ राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

तथापि, कृष्णा उपखोऱ्यामध्ये कुंभी, कासारी, वारणा, कोयना व कृष्णा या नद्यामध्ये उपलब्ध असलेले अतिरिक्त पाणी दुष्काळी व तुटीच्या भीमा उपखोऱ्यात वळविण्यासाठी कृष्णा-भीमा स्थिरीकरण प्रकल्पास शासन निर्णय दि.०४/०२/२००४ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे.

(२) कृष्णा-भीमा स्थिरीकरण योजनेमुळे पुणे, सोलापूर, सातारा, सांगली, उस्मानाबाद व बीड या जिल्हयातील एकूण ५,५०,२९० हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे.

(३) कृष्णा-भीमा स्थिरीकरणांतर्गत समावेश असलेल्या निरा-भीमा जोड कालव्याची कामे एकाच उपखोऱ्यातील असल्यामुळे प्रगतीपथावर आहे. सदर योजनेच्या स्थिरीकरणासाठी दरवर्षी साधारण रु.१०,०००/- एवढी नाममात्र निधीची तरतूद गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्यामार्फत करण्यात येते.

तसेच द्वितीय कृष्णा पाणी तंटा लवादाने एका उपखोऱ्यातून दुसऱ्या उपखोऱ्यात पाणी वळविण्यास मनाई केली आहे. त्यानुसार कृष्णा-भीमा स्थिरीकरण प्रकल्पाचे कार्यान्वयन शक्य नसल्याने प्रकल्प हाती घेता येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्हयातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील कुशल कामासाठी निधी मिळण्याबाबत

**(२४) * १३७१११ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील कुशल कामाचा ४.६७ कोटी रुपये इतक्या निधीची मागणी करुनही दिला जात नसल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी न मिळाल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना रोजगारापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कुशल कामासाठी निधी तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयदत्त क्षीरसागर :** (१) व (२) हे खरे नाही, निधीमधून उपलब्धतेनुसार रु. ८.५८ कोटी कुशल निधीचे वाटप करण्यात आलेले आहे.
(३) शासनस्तरावरुन रु. २७३.३३ कोटीचा निधी नरेगा आयुक्तालयास दि. २७ मे, २०१९ रोजी वितरीत करण्यात आलेला आहे. उपलब्ध निधीमधून लवकरात लवकर जिल्हयाला निधी वितरीत करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे करवंड व मौजे दहिद खुर्द (जि.बुलढाणा) येथील पाझर तलावास मंजूरी मिळण्याबाबत

**(२५) * १३९९६२ श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे करवंड (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील लघु पाटबंधारे विभागातंर्गत असलेले पाझर तलाव क्रमांक १ व पाझर तलाव क्रमांक २ तसेच मौजे दहिद खुर्द (ता.जि.बुलढाणा) येथील पाझर तलावाचे प्रस्ताव संबंधीत विभागाकडून शासनाला पाठवुन १ वर्षाचा कालावधी होवुन सुध्दा प्रत्यक्ष कामाला सुरूवात झाली नसल्याचे माहे मे २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त पाझर तलावाला प्रशासकीय मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्यासह इतर प्रक्रीया पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजीराव सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

(२) मौजे करवंड, ता.चिखली, जि.बुलढाणा येथील पाझर तलाव क्र.१ ला प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून सदर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. करारनामा क्र.ब-१/ ५८८/२०१९, दिनांक ८.३.२०१९ अन्वये सदर कामास कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे.

मौजे करवंड, ता.चिखली, जि.बुलढाणा येथील पाझर तलाव क्र.२ मधील बुडीत क्षेत्रात व भिंतीच्या मुख्य भागात खाजगी जमीन असल्याने व सदर जमिनीचा शासनाच्या वाढीव दराने द्यावयाच्या मोबदल्याचा विचार केला असता, सदर कामाचे अंदाजपत्रक मापदंडात असफल ठरत आहे.

मौजे दहिद खुर्द, ता.बुलढाणा या पाझर तलावाचे कामास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून त्यानुसार कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. सद्यस्थितीत पाझर तलावाचे ८० टक्के काम पूर्ण झाले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील दुरवस्था झालेल्या रस्त्यांसाठी निधी मंजूर करणेबाबत

**(२६) * १३९५७४ श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील गुळसडी ते जाळे वस्ती, वाशिंबे ते वाघमोडे वस्ती या दुरवस्था झालेल्या रस्त्यांना मुख्यमंत्री ग्रामसडक व संशोधन व विकास (R&D) योजनेमध्ये विशेष बाब म्हणून समावेश करुन निधी मंजूर करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर रस्ते मंजूरीचा प्रस्ताव उद्दिष्ट / निकष तसेच निधीच्या उपलब्धतेनुसार तपासुन पुढील कार्यवाही विचारधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील जिल्हा परिषदेच्या शाळेमधील विद्यार्थिनींशी शिक्षकाने गैरवर्तन केल्याबाबत

**(२७) * १४०३९४ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील १२ अल्पवयीन विद्यार्थिनींशी शिक्षकाने गैरवर्तन केल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शिक्षण विभागाच्या त्रिस्तरीय समितीने आपला अहवाल सादर केला आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय हे खरे आहे.
(२), (३) व (४) त्रिस्तरीय समितीने अहवाल सादर केला आहे. तसेच संबंधित शिक्षकाविरुध्द लोहगाव पोलिस स्टेशन, पुणे येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. शिवाय संबंधित शिक्षकासह अन्य पाच शिक्षकांना निलंबित करण्यात आले असून त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई सुरु करण्यात आली आहे.

-----------------

## वसई-विरार (जि.पालघर) महापालिकेच्या हद्दीत असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळा व प्राथमिक आरोग्य केंद्र महापालिकेला हस्तांतरित करणेबाबत

**(२८) * १४१८०३ श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार (जि.पालघर) शहर महापालिकेच्या हद्दीत असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळा आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे पालिकेला हस्तांतरित करण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी अनेक वेळा शासनाला प्रस्ताव देऊनही अद्यापपर्यंत जिल्हा परिषद शाळा आणि प्राथमिक आरोग्य केंद्र वसई-विरार महापालिकेला हस्तांतरित न केल्यामुळे आरोग्य केंद्रांची व शाळांची दुरवस्था होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाळांची आणि प्राथमिक आरोग्य केंद्राची शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार वसई-विरार शहर महापालिकेच्या हद्दीत येत असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळा आणि प्राथमिक आरोग्य केंद्र पालिकेला हस्तांतरित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) वसई-विरार महानगरपालिका हद्दीत समाविष्ठ गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळां महानगर पालिकाकडे हस्तांतरण करण्याची बाब सद्यस्थितीत विभागाच्या विचाराधिन नाही.

तथापि, प्राथमिक आरोग्य केंद्र महानगर पालिकाकडे हस्तांतरण करण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माणगांव (जि.रायगड) तालुक्यातील कुंभे जलविद्युत प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शेतक-यांचे पुनर्वसन करणेबाबत

**(२९) * १४००१३ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माणगांव (जि.रायगड) तालुक्यातील कुंभे जलविद्युत प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शेतक-यांचे योग्य पुनर्वसन अद्याप झालेले नसल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार या प्रकल्पग्रस्तांचे तात्काळ पुनर्वसन करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

(२) कुंभे जलविद्युत प्रकल्पांतर्गत धरणाच्या बुडीत क्षेत्रातील मौजे कुंभे ता.माणगांव गावठाणातील २०५ कुटुंबे (लोकसंख्या ७२९) बाधित होत असून बाधित कुटुंबांपैकी १२० कुटुंबे (लोकसंख्या ३०४) कुंभे गावातील सर्वे नं. ६३/१ व ८५ कुटुंबे (लोकसंख्या ४२५) भादाव ता. माणगांव सर्वे नं.६४ येथिल पुनर्वसन गांवठाणात माहे मे, २०१२ मध्ये स्थलांतरीत झालेली आहेत. कुंभे व भादाव पुनर्वसन गांवठाणांस महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तिंचे पुनर्वसन अधिनियम १९९९ चे कलम १०(३) नुसार देय १८ नागरी सुविधांची कामे जलसंपदा विभागाकडून पूर्ण झाली आहेत.

महसुल/पुनर्वसन विभागाकडून प्रकल्पग्रस्तांना भूखंड वाटपाचे काम तसेच पुनर्वसन गावठाणांमध्ये १२ वाढीव भूखंड तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## केशव नगर (जि.पुणे) येथील मुळा मुठा नदीवर मातीचा भराव टाकून अनधिकृत बंधारा बांधल्याबाबत

**(३०) * १४०६३६ श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केशव नगर (जि.पुणे) येथे बांधकाम व्यवसायीकाने मुळा मुठा नदीवर अतिक्रमण करून नदीत मातीचा भराव टाकून बंधारा बांधल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केशव नगर येथील जॅकवेल बंदराच्या प्रवाहाच्या वरच्या बाजूस नदीच्या पात्रात बांधलेल्या बंधाऱ्यातून बेकायदेशीर रित्या मोटरद्वारे सदर बांधकाम व्यवसायिक पाणी वापरत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बंधाऱ्याच्या पाण्याचा फुगवटा निर्माण होऊन संपूर्ण केशवनगर खराडी मुंढवा परिसरात पाणी साठून रोगराई पसरली असल्याने नागरिकांने पाटबंधारे विभागाकडे नदीत बेकायदेशीर भराव टाकून बांधकाम करणाऱ्या सदर बांधकाम व्यावसायिकावर कारवाई करण्याची मागणी केली आहे,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार अनधिकृतरित्या बंधारा बांधणाऱ्या व्यवसायिकावर व त्यास सहाय्य करणाऱ्या अधिकारी-कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

बांधकाम व्यावसायिकास महामंडळाने पत्र दि. १४/३/२०१८ अन्वये मुळा-मुठा नदीतून घरगुती पाणीवापरास रितसर परवानगी दिलेली आहे. त्यानुषंगाने व्यावसायिकाने पाणी पुरवठा योजनेच्या इनटेक स्ट्रक्चरचे बांधकाम करणेसाठी नदीवर तात्पुरता मातीचा भराव (कॉफरडॅम) टाकलेला होता. बांधकाम पूर्ण झाल्यानंतर सदर भराव काढून टाकण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) नागरीकांनी मागणी केली हे खरे आहे.

(४) बांधकाम व्यावसायिकाने बंधारा काढून टाकल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मेळघाटातील (जि.अमरावती) ग्रामपंचायतीमध्ये मनरेगा अंतर्गत पांदण रस्ते व इतर रस्त्यांच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(३१) * १४१९४५ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेळघाटातील (जि.अमरावती) सुमारे २०० हून अधिक ग्रामपंचायतीमध्ये मागील चार वर्षात मनरेगा अंतर्गत पांदण रस्ते व इतर रस्त्यांची कामे न करता सुमारे ५० कोटी रुपयांचे देयक मंजूर करुन गैरव्यवहार केल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार संबधित दोषींवर कारवाई करुन त्यांच्याकडून सदरहू निधी वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयदत्त क्षीरसागर :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) होय, परंतु कुशल देयके अदा करण्यात आले नाही.
(३) जिल्हा परिषद स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सदर प्रकरणी सुनावणी प्रक्रिया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात वन्य जीव व प्राण्यांची तस्करी करून विक्री होत असल्याबाबत

**(३२) * १४१८४७ श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वन्य जीव व प्राण्यांची मोठ्या प्रमाणावर तस्करी करून विक्री होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे-सातारा या रस्त्यावर बिबट्याच्या बछडयांची तस्करी करून विक्री होत असल्याचे दिनांक २० मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार संबंधितांवर कारवाई करण्यासह वन्य प्राण्यांची होत असलेली तस्करी रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) राज्यात काही ठिकाणी वन्यजीव व प्राण्यांची काही प्रमाणात तस्करी होत असल्याची प्रकरणे निदर्शनास आली आहे. दिनांक २० मे २०१९ रोजी पुणे - सातारा या रस्त्यावरील खेड शिवापूर टोल नाका येथे २ बिबट्याच्या बछडयांची तस्करी होत असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर प्रकरणी गुन्हा दाखल केला असून ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास व कार्यवाही सुरु आहे.

(४) वन्यप्राण्यांची तस्करी रोखण्यासाठी वन विभागामार्फत खालील प्रमाणे उपययोजना राबविण्यात येत आहेत :-

• वन विभाग व पोलीस विभाग या दोन्हा विभागांकडून समन्वय साधून तात्काळ संबंधितांवर वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ अंतर्गत गुन्हा नोंदवून कारवाई करुन प्रकरण न्यायप्रविष्ठ केले जाते.

• वनक्षेत्रपाल, फिरते पथक यांचेमार्फत गस्त व वाहन तपासणी मोहीम राबविली जाते. तसेच क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी हे देखील गस्त व वाहन तपासणी करतात.

• वनविभागाच्या क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांना गुप्त वार्ता प्रबोधीनी, पुणे या संस्थेमार्फत प्रशिक्षण देण्यात आले आहे.

• जंगलात आवश्यक त्या ठिकाणी संरक्षण मनोरे उभारलेले आहेत. संरक्षित क्षेत्रात संरक्षण कुट्यांची उभारणी केली आहे.

• प्रकल्प क्षेत्रात आवश्यक त्या ठिकाणी तपासणी नाके असून त्याद्वारे वाहनांची तपासणी करण्यात येते

• वनकर्मचा-यांना पिस्तुल / रायफल सारख्या शस्त्रांचा पुरवठा केलेला आहे.

• शिका-याबाबत गोपनियरीत्या माहिती संकलीत करण्यात येते. खब-याला बक्षिस देण्यासाठी गुप्त सेवा निधीची तरतूद केलेली आहे.

• व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात वायरलेस यंत्रणा कार्यान्वित आहेत.

• श्वान पथक ठेवण्यात आले असून त्यांच्याद्वारे संशयास्पद ठिकाणी वन्यप्राण्यांचे अवयवांचा अवैध व्यापार, वाहतुक याचा शोध घेण्यात येतो.

• वाईल्ड लाईफ क्राईम कंट्रोल ब्युरो, भारत सरकार यांचे सहाय्य वन्यप्राण्यांची तस्करी व इतर गुन्हयांवर नियंत्रण ठेवण्यासाठी घेण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदगांव (जि.नाशिक) तालुक्यातील मन्याड नदीवरील पुलाचे बांधकाम करणेबाबत

**(३३) * १४०३९३ श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगांव (जि.नाशिक) तालुक्यातील मुख्यमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत सन २०१६-१७ मध्ये साकोरा चांदोरा रणखेडा या रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आले असून या रस्त्यावरील मन्याड नदीवरील पुलाचे बांधकाम करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाळ्याच्या कालावधीत उपरोक्त रस्त्यावरील मन्याड नदीला पूर येत असल्याने चांदोरा व परिसरातील गावांमधील जनजीवन विस्कळीत होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त ठिकाणी पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सदर पुलाचा प्रस्ताव प्राप्त झाला असून निकष व निधीच्या उपलब्धतेनुसार छाननी सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सावरगाव फॉरेस्ट (ता.मानोरा, जि.वाशिम) येथील रस्त्याची निविदा विना परवानगी पूर्ण केल्याबाबत

**(३४) * १४०८३५ श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावरगाव फॉरेस्ट (ता.मानोरा, जि.वाशिम) येथील मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत वन विभागाची कोणतीही परवानगी नसताना व प्रशासकीय मान्यता देते वेळेस वन विभागाद्वारे देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्राची प्रत नसतानासुद्धा या योजनेतील उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी निविदा प्रक्रिया पूर्ण करून रस्त्याचे बांधकामाचे आदेश कंत्राटदाराला दिले असल्याचे माहे, मे मध्ये निदर्शनास आले, हे खर आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची परवानगी नसताना सुद्धा निविदा प्रक्रिया पूर्ण करणाऱ्या कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांची चौकशी करुन शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे शहरातील धोकादायक इमारतींच्या यादीमध्ये समाविष्ट असलेल्या जिल्हा परिषद मुख्यालय इमारतीची पुनर्बांधणी करणेबाबत

**(३५) * १३६१३३ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील धोकादायक इमारतींच्या यादीमध्ये समाविष्ट असलेल्या जिल्हा परिषद मुख्यालय इमारतीमधील दुस-या मजल्यावरील स्लॅब कोसळण्याची दुर्घटना दिनांक २० डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुर्घटनेच्या अनुषंगाने सदरहू जिल्हा परिषद मुख्यालय इमारतीची पाहणी शासनाने केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार धोकादायक स्थितीत असलेल्या ठाणे जिल्हा परिषद मुख्यालय इमारतीची पुनर्बांधणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

जिल्हा परिषद, ठाणे मुख्यालय इमारतीतील दुसऱ्या मजल्यावरील स्लॅब कोसळला नसून प्लॅस्टर अंशत: निखळले आहे.

(२) व (३) होय.

जिल्हा परिषद, ठाणे मुख्यालयाची इमारत धोकादायक असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेचे कार्यालय, जिल्हा परिषदेच्या इतर कार्यालयात स्थलांतरीत करण्यात आले आहे. जिल्हा परिषद, ठाणे प्रशासकीय मुख्यालय पुनर्बांधणी करण्याकरिता प्रस्ताव ढोबळ अंदाजपत्रकासह शासनास प्राप्त झाला आहे. त्यामुळे परिपूर्ण प्रस्ताव पाठविण्याबाबत जिल्हा परिषद, ठाणे यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खडकी (ता.हिंगणा, जि.नागपूर) ग्रामपंचायत अंतर्गत वन विभागाच्या जागेवर अवैधरित्या गौणखनिजांचे उत्खनन केल्याबाबत

**(३६) * १३५४७२ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकी (ता.हिंगणा, जि.नागपूर) ग्रामपंचायत अंतर्गत वन विभागाच्या जागेवर अवैध उत्खनन करुन कोट्यवधी रुपयांच्या गौणखनिजांची विक्री केली असल्याची बाब माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गौणखनिजांचे उत्खनन हे पर्यावरण विभागाची अनुमती न घेता केले असुन या प्रकरणी वन विभागाच्या कर्मचाऱ्याकडूनही दुर्लक्ष झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार अवैधरित्या गौणखनिजांचे उत्खनन करणाऱ्यांवर व संबंधित कर्मचा-यांवर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हिंगणा वनपरिक्षेत्रातील (तालुका हिंगणा, ग्रामपंचायत खडकी) उपवनक्षेत्र पेंढरी, बिट येटेवाही, मौजा सिंगारदिप अधिसूचित राखीव वन कक्ष क्र. १८५ च्या एकूण ०.२४ हे आर क्षेत्रावर श्री.हरीष दशरथलाल फुलसंगे, रा.नागपूर यांच्याव्दारे रु. १.९९ कोटी रुपयांचे अवैध उत्खनन करुन विक्री केल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये निदर्शनास आले आहे.

(२) मौजे सिंगारदिप मधील खाजगी वन क्षेत्र सर्व्हे क्र.९३ मध्ये गौणखनिजांचे उत्खनन करण्यासाठी सन २००६, २०१० व २०१३ मध्ये महसूल विभागाकडून परवानगी घेण्यात आली होती.

तथापि, दिनांक १५.५.२०१८ रोजी वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना अवैध उत्खननाबाबत माहिती मिळताच दिनांक २०.६.२०१८ रोजी वनगुन्हा नोंदवण्यात आला आहे.

(३) व (४) वनपरिक्षेत्र अधिकारी, हिंगणा यांनी प्रकरणाची संपुर्ण चौकशी करुन अवैधरित्या उत्खनन करणाऱ्या आरोपीविरुद्ध प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, हिंगणा यांच्या न्यायालयात दिनांक २६.४.२०१९ रोजी फिर्याद दाखल करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी दोषी कर्मचाऱ्यांविरुद्ध कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई (जि.पालघर) येथील महा-ई-सेवा केंद्रातून बनावट ऑटो रिक्षा परवाने दिले जात असल्याबाबत

**(३७) * १३८६२६ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) येथील महा-ई-सेवा केंद्रातून ऑटो रिक्षा परवाने प्राप्त करण्यासाठी बनावट दाखले दिले जात असल्याचे प्रकार नायब तहसिलदार यांनी निदर्शनास आणले असून या प्रकरणी १० जणांवर दिनांक ११ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास गुन्हे दाखल करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑटो रिक्षा परवान्यासाठी महाराष्ट्रात १५ वर्षे वास्तव्याची अट असल्याने हजारो परप्रांतीयांनी मोठ्या प्रमाणात बनावट दाखल्याद्वारे ऑटो रिक्षाचे परवाने प्राप्त करून घेतले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार वसईच्या महा-ई-सेवा केंद्राचे बनावट दाखले देणारे तसेच बनावट दाखल्याद्वारे परवाने देणारे संबंधित अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे अंशतः खरे आहे.

शाळा सोडल्याचे बोगस दाखले सादर करुन वसई (जि.पालघर) येथील महा-ई-सेवा केंद्रातून १५ वर्ष स्थानिक वास्तव्य व अधिवास दाखले प्राप्त करुन घेतल्याप्रकरणी एकुण ९ जणांवर गुन्हा दाखल केल्याचे तसेच सदर बाब न्यायप्रविष्ट असल्याचे तहसिलदार, वसई यांनी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, वसई यांना कळविले आहे.

(२) तहसिलदार कार्यालय, वसई यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीनूसार गुन्हा दाखल केलेल्या ९ अर्जदारांनी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वसई येथून ॲटोरिक्षा बॅज व परवाना घेतल्याबाबत कार्यालयीन अभिलेख्यांची तपासणी केली असता उक्त ९ अर्जदारांपैकी ५ अर्जदारांनी सदर रहिवास दाखल्याच्या आधारेॲटोरिक्षा बॅज प्राप्त करुन घेतल्याचे तसेच ॲटोरिक्षा परवान्याकरिता आवश्यक असलेले इरादापत्र प्राप्त करुन घेतल्याचे आढळून आले आहे. सदर ५ पैकी २ इरादापत्रधारकांनी ॲटोरिक्षा खरेदी करुन वाहन नोंदणी करुन घेतल्याचे तसेच उक्त २ अर्जदारांपैकी १ अर्जदारास ॲटोरिक्षा परवाना जारी केल्याचे आढळून आले आहे.

(३) उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, वसई यांनी तहसिलदार वसई यांच्याकडून प्राप्त पत्राच्या आधारे कार्यालयीन अभिलेखाची पडताळणी व चौकशी करुन ५ अर्जदारांना त्यांनी कार्यालयास सादर केलेल्या १५ वर्षे स्थानिक वास्तव्याच्या दाखल्याच्या आधारे प्राप्त केलेले ॲटोरिक्षा बॅज रद्द करणेबाबत तसेच त्यापैकी १ अर्जदारास त्याने प्राप्त केलेला ॲटोरिक्षा परवाना रद्द करणेबाबत दि.०७.०६.२०१९ व दि.१०.०६.२०१९ रोजी नोटीस जारी करण्यात आलेल्या आहेत.

(४) बोगस दाखले देण्या-या महा-ई-सेवा केंद्राचे लॉगीन आयडी बंद करुन संबंधितांना दिलेले दाखले रद्द करणेबाबत तहसिलदार वसई यांनी दि.०४.०४.२०१९ च्या पत्रान्वये महाऑनलाईन लि. यांना कळविले आहे. तसेच यासंदर्भात चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याचे आदेश शासनाने दिलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिवरा ते वाघकूळ फाटा (ता.मालेगाव, जि.वाशीम) या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(३८) * १४२३७६ श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिवरा ते वाघकूळ फाटा (ता.मालेगाव, जि.वाशीम) या एक कोटी पंचवीस लाख रुपये अंदाजपत्रक असलेल्या रस्त्याच्या कामाला प्रारंभ करण्यात आला असून सदर काम प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नियमबाहयपणे फलकाविना सुरु असल्याचे तसेच निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फलक न लावल्यामुळे या कामाची माहिती मिळविण्यास अडचणी येत असून रस्त्यावरील पुलासाठी खोदण्यात आलेल्या खडडयाच्या बाजूला दिशादर्शक फलक न लावल्यामुळे खडयात पडून एक व्यक्ती जखमी झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार या रस्त्याच्या माहीतीचे फलक लावून रस्त्याचे काम दर्जेदार करण्यासह निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, या कामाबाबत नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात आलेली आहे.

-----------------

## बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या वीजबील न भरलेल्या शाळांचा वीज पुरवठा खंडित केल्याबाबत

**(३९) * १४०९६९ श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ७४ शाळा डिजिटल झाल्या असून यापैकी ४२ शाळांनी वीजबील न भरल्याने वीज वितरण कंपनीने या शाळांचा वीज पुरवठा खंडित केल्याचे माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीज पुरवठा खंडीत केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अभ्यासक्रमावर त्याचा परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त शाळांचा वीज पुरवठा सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
इतर शैक्षणिक साधनांचा वापर करुन अध्यापन कार्य करण्यात येत आहे.
(३) जिल्हा परिषदेच्या ४२ शाळापैकी ८ शाळांची विद्युत देयक भरणा करण्यात आली असून या शाळांचा विद्युत पुरवठा सुरळीत चालु आहे. उर्वरित ३४ शाळांचा वीज पुरवठा सुरु करण्यासाठी सन २०१९-२०२० शैक्षणिक वर्षाच्या शाळां अनुदानातून प्राधान्याने वीज बील भरणा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे बावधन (जि.पुणे) या वनक्षेत्राच्या सिमाभिंतीच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(४०) * १३६५४७ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे बावधान (जि.पुणे) येथे वनक्षेत्रपाल, भांबुर्डा यांनी वनक्षेत्राची मोजणी न करता वन हद्दीच्या आत संरक्षक भिंत बांधून विकासकाच्या हितासाठी शासनाच्या अटी-शर्थींचा भंग केला असल्याची बाब माहे मार्च, २०१९ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन वनक्षेत्रपाल, भांबुर्डा यांच्यावर दोषारोप पत्र बजावण्यात आले असून या प्रकरणामध्ये विकासकाशी संगनमत करुन शासनाची दिशाभूल केली असल्याचे स्पष्ट होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मौजे ७बावधन येथे वनक्षेत्राभोवती राखीव वनांचे संरक्षण करण्याकरिता व अतिक्रमण रोखण्यासाठी शासनाकडून प्राप्त रु.१६२२.७१ लक्ष अनुदानातून झालेल्या सिमाभिंतीच्या कामाची निविदाप्रक्रिया, कंत्राटदारास बिले अदा केल्याचा तपशील व कामांचे अंदाजपत्रक इ. माहितीची लेखी पत्राद्वारे मागणी केली असता सदर माहिती देण्यास संबंधित प्रशासन विलंब करीत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) मौजे बावधन, जि.पुणे मधील सं.नं. २१ चे वनक्षेत्राची मोजणी केली असता, ३३० र.मी. लांबीची सिमाभिंत वन हद्दीच्या आत बांधल्याने सुमारे ०.३८ हे. इतके क्षेत्र सुटल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे.

सदर प्रकरणी तत्कालीन वनपरिक्षेत्र अधिकारी, भांबुर्डा यांच्या विरुद्ध मुख्य वनसंरक्षक (प्रा.), पुणे यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ नियम ८ अंतर्गत दिनांक २९.१.२०१९ रोजी दोषारोप पत्र बजाविले आहे.

तथापि, प्रकरणी विकासकाच्या हितासाठी/संगनमत करुन शासनाची दिशाभूल केल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रस्ते विकास (पीसीआय) आराखड्यामध्ये समावेश नसलेल्या रस्त्यांच्या कामांबाबत

**(४१) * १३६६३३ श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रस्ते विकास (पीसीआय) आराखड्यात समाविष्ट नसलेल्या कामांची वस्तुस्थितीदर्शक व स्थानिक गरज लक्षात घेवून पीसीआय इंडेक्स बाहेरील किमान २० टक्के आवश्यक रस्ते करण्याचे जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अधिकार द्यावेत अशी मागणी लोकप्रतिनिधींनी मा.ग्रामविकास मंत्री यांचेकडे दिनांक २७ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्ते विकास आराखड्याचे फेरसर्वेक्षण करून सन २०१८-१९ करिता नव्याने पीसीआय आरखडा लागू करण्याची परवानगी देण्याकरिता नाशिक जिल्हा परिषदेने दिनांक २८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामीण भागातील रस्ते दुरुस्तीसाठी पीसीआय इंडेक्स परिपत्रकात सुधारणा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग यांचे सर्वेक्षण करुन रस्त्यांच्या स्थितीनुसार व दुरुस्तीची आवश्यकता विचारात घेऊन सदर रस्त्यांना पीसीआय निर्देशांक देण्यात येतो. पीसीआय आराखड्यानुसार ग्रामीण रस्त्यांवरील कमकुवत पुल, मो-या वाहतूक वर्दळ विचारात घेऊन त्यांची दुरुस्ती करण्यासंदर्भात प्राधान्य देण्याच्या सूचना शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, क्र.जिवायो-२०१५/प्र.क्र.१९१/पंरा-८, दि. ०३.०९.२०१६ अन्वये देण्यात आलेल्या आहेत.

रस्ते विकास आराखड्यात समाविष्ट नसलेल्या पीसीआय बाहेरील रस्त्याच्या दुरुस्तीसाठी मंजूरी देण्याच्या अनुषंगाने सदर शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याबाबतची कोणतीही बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

-----------------

## राळेगाव पंचायत समितीअंतर्गत (जि.यवतमाळ) ग्रामपंचायतींमध्ये सिंचन विहिरींच्या कामात होत असलेला गैरप्रकार

**(४२) * १३७४४२ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राळेगाव पंचायत समितीअंतर्गत (जि.यवतमाळ) अनेक ग्रामपंचायतींमध्ये धडक सिंचन विहिरींची कामे सुरू असून पंचायत समितीमधील काही अधिकाऱ्यांनी नियुक्त केलेल्या कंत्राटदारांकडून ही कामे केली जात असल्याने लाभार्थी शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार संबंधीत कंत्रादार व अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयदत्त क्षीरसागर :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्हयातील केटीएस जिल्हा सामान्य रूग्णालयातील अतिदक्षता विभागात मुदतबाहय इंजेक्शन आढळून आल्याबाबत

**(४३) * १३६८९५ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयातील केटीएस जिल्हा सामान्य रूग्णालयातील अतिदक्षता विभागामध्ये मुदतबाहय इंजेक्शन आढळून आल्याची बाब दिनांक ३० एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणाची चौकशी करण्याकरिता जिल्हाधिकारी, गोंदिया यांनी पाच सदस्यांची चौकशी समिती गठीत केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही. तथापि, शासकीय रूग्णालयात मुदतबाह्य इंजेक्शन/औषधी आढळून आल्याच्या बातम्या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या होत्या.
(२) हे खरे आहे.
(३) सदर समितीच्या चौकशी अहवालानुसार उक्त संस्थेमध्ये मुदतबाह्य औषधे आढळून आली नसल्याने कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्ह्यातील टेंभू उपसा सिंचन योजनेस १० टीएमसी जादा पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४४) * १४०३५३ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्हयातील उपसा सिंचन योजनेतंर्गत कोयना आणि चांदोली धरणातील शिल्लक अतिरिक्त पाण्याचे फेरवाटप करुन टेंभू उपसा योजनेला १० टीएमसी जादा पाणी उपलब्ध करून द्यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधिनीं मा.मुख्यमंत्री यांच्याकडे माहे जानेवारी व फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, टेंभू उपसा सिंचन योजनेसाठी वारणा व (चांदोली) कोयना धरणातील शिल्लक राहणारे अतिरिक्त १० टी.एम.सी. पाणी उपलब्ध करुन वंचित गावांचा टेंभू योजनेमध्ये समावेश करावा असे निवेदन मा.लोकप्रतिधिनी दि.०१.१०.२०१९ रोजीच्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्री महोदयांना दिलेले आहे.

(२) लवाद निर्णयाच्या अधिन राहून बिगर सिंचन पाणी वापराव्यातिरिक्त पाणी शिल्लक राहते किंवा कसे याबाबतचा जलशास्त्रीय अभ्यास क्षेत्रीय स्तरावर करणेत येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रावेर-पुनखेडा-पातोंडी (जि.जळगाव) रस्त्यावरील पुनखेडा गावाजवळील पुलाची झालेली दुरवस्था

**(४५) * १३८५३७ श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर-पुनखेडा-पातोंडी (जि.जळगाव) रस्त्यावरील पुनखेडा गावाजवळील पुलाची दुरवस्था झाली असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाची शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार पुलाचे नुतनीकरण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर पुलाचा प्रस्ताव प्राप्त झाला असून निकष व निधीच्या उपलब्धतेनुसार छाननी सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दाभोळ (ता.चिपळूण,जि.रत्नागिरी) खाडीतील हाऊसबोट प्रकल्प पुनश्च सुरु करणेबाबत

**(४६) * १३७७४३ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दाभोळ (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) खाडीत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने सुमारे ३ कोटी रूपये खर्च करुन खरेदी केलेल्या दोन्ही हाऊसबोटी सद्य:स्थितीत बंद अवस्थेत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्प सद्यस्थितीत बंद असल्याने शासनाचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार पर्यटनाचा सदर प्रकल्प राबविण्यास दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह सदर प्रकल्प पुन्हा सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे अंशत: खरे आहे.
महामंडळाने दाभोळ खाडीकरीता सद्य:स्थितीत एक हाऊसबोट खरेदी केलेली आहे.
(२) होय.
(३) व (४) हाऊसबोटींकरीता महामंडळाकडे ड्रायडॉकची व्यवस्था उपलब्ध नसल्याने तसेच हाऊसबोटींच्या प्रचलन, देखभाल व दुरुस्तीवर मोठ्या प्रमाणात खर्च होत असल्याने महामंडळाने हाऊसबोटी “जश्या आहेत त्या स्थितीत” खाजगी उद्योजकांच्या सहकार्याने चालविणेचा निर्णय घेतला असून

दोन वेळा निविदा काढण्यात आल्या होत्या. तथापि, त्यास प्रतिसाद न मिळाल्याने तिसऱ्या वेळेस जानेवारी, २०१९ मध्ये फेर निविदा काढण्यात आली असून प्राप्त निविदेनुसार संस्थेची नेमणूक करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुर्ला (मुंबई) येथील राज्य परिवहन महामंडळाच्या आगारास लागलेल्या आगीमुळे झालेले नुकसान

**(४७) * १३५४४४ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुर्ला (मुंबई) येथील राज्य परिवहन महामंडळाच्या आगारास दिनांक १० फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास आग लागल्याने राज्य परिवहन महामंडळाच्या चार गाड्यांसह इतर पांच वाहनांचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२) व (३) नाही.

मुंबई उपनगरातील राज्य परिवहन महामंडळाच्या कुर्ला आगारास आग लागली नसून राज्य परिवहन कुर्ला नेहरुनगर बसस्थानकाच्या आवारात उप प्रादेशिक परिवहन विभागाने जमा केलेल्या अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांना आग लागली होती. सदर आगीत राज्य परिवहन महामंडळाच्या कोणत्याही बसला आग लागली नाही. तसेच सदर आगीत महामंडळाचे

कोणत्याही प्रकारचे आर्थिक व जिवीत नुकसान झाले नाही. सदर आगीमध्ये उप प्रादेशिक परिवहन विभागाने जमा केलेल्या अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या व त्यानुषंगाने जप्त केलेल्या १० वाहनांचे नुकसान झाले आहे. सदर आगीबाबत कुर्ला नेहरुननगर पोलीस ठाण्यामार्फत आकस्मिक आग लागल्याच्या घटनेची नोंद ठाणे दैनंदिनी क्र.३२, दि.१०.०२.२०१९ नुसार करण्यात आलेली आहे. त्यानुसार पोलीसांमार्फत तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## केर-भेकुर्ली (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) रस्त्यावर दरडी कोसळणाऱ्या ठिकाणी संरक्षण भिंत बांधण्याच्या कामात झालेला गैरप्रकार

**(४८) * १३९४१४ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केर-भेकुर्ली (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) रस्त्यावर पावसामुळे दरड कोसळून रस्ता बंद झाला होता त्यामुळे सदरहू रस्त्यावर दरडी कोसळणाऱ्या ठिकाणी संरक्षण भिंत बांधण्यासाठी पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत कोट्यवधी निधी उपलब्ध करून देण्यात आल्यानंतर सदरहू ठिकाणी संरक्षण भिंत बांधण्याचे निश्चित करण्यात आले असता कंत्राटदाराने केर-भेकुर्ली रस्त्यावर दरडी कोसळणारा भाग वगळून नको तिथे संरक्षण भिंती बांधल्या असून या प्रकरणी झालेल्या गैरप्रकाराबाबत स्थानिकांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, दोडामार्ग आदींकडे लेखी निवेदनाद्वारे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

केर-भेकुर्ली (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) या रस्त्यावर ग्रामस्थांच्या समवेत झालेल्या पाहणीमध्ये ठरल्यानुसार ज्या ठिकाणी रस्त्याच्या सुरक्षिततेसाठी संरक्षक भिंत बांधणे अत्यावश्यक आहे, अशा कि.मी.१३/६०० ते १३/८०० व १५/१०० मध्ये संरक्षक भिंती बांधण्यात आल्या आहेत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील सर जे.जे. रुग्णालयात शस्त्रक्रियेसाठी लागणाऱ्या उपकरणांचा पुरेसा साठा असतानाही खरेदी करण्यात येत असल्याबाबत

**(४९) * १४०६०९ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सर जे.जे. रुग्णालयात शस्त्रक्रियेसाठी वापरला जाणारा धागा आणि स्टॅपप्लरचा साठा पुरेसा असतानाही स्थानिक बाजारपेठेतून सदर वस्तू खरेदी करण्यात येत असल्याचे दिनांक १७ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खरेदी करण्यासाठी रुग्णालयातील डॉक्टर व फार्मासिस्टला परदेशी सफर घडविण्यात आल्याचे ऑल फूड अँड ड्रग लायसन्स होल्डर्स फाऊंडेशन यांच्यामार्फत निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णालयात दोन कोटी रुपयांची औषधे तसेच शस्त्रक्रियासाठी चार कोटी रुपयांचा उपकरणांचा साठा उपलब्ध असुन सदर उपकरणांचा वापर न झाल्याने साठा वाया गेला असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, त्यानुसार सदर वस्तू खरेदी करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) उत्तर भाग क्र.१, २ व ३ पाहता चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चासकमान (ता.खेड, जि.पुणे) धरणाच्या डाव्या कालव्याच्या अस्तरीकरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(५०) * १४१४६४ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चासकमान (ता.खेड, जि.पुणे) धरणाच्या डाव्या कालव्याला मोठी गळती असल्यामुळे पाणी वाया जात असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चासकमान डाव्या कालव्याल्या धरणातुन ५५० क्युसेकने सोडलेले पाणी टेल भागामध्ये १०० क्युसेकनेही पोहचत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चासकमान धरणाच्या डाव्या कालव्याच्या अस्तरीकरणाचे कामही अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

चासकमान प्रकल्पाचे डाव्या कालव्यावरील खोदाईची व भरावाची बहुतांश कामे रोजगार हमी योजनेंतर्गत करण्यात आली आहे. त्यावेळी कालव्याचा भराव करताना काळया मातीचा गाभा काही ठिकाणी भरलेला

नसल्यामुळे कालव्यामधून तसेच कालव्यावरील नलिका मोरी व लादी मोरी इत्यादी बांधकामामधून मोठया प्रमाणात पाण्याची गळती होत असते. त्यामुळे सद्य:स्थितीत ५५० क्युसेक्सपेक्षा जास्त विसर्गाने पाणी सोडता येत नाही.

(२) होय.

(३) अंशत: खरे आहे.

चासकमान डाव्या कालव्याचे संकल्पन अस्तरीकरणासह केले आहे. तथापि, कालव्याच्या ० ते ७२ कि.मी. या लांबीतील १६ कि.मी. लांबीतील अस्तरीकरण पूर्ण झाले आहे. उर्वरित लांबीतील अस्तरीकरण न झाल्याने संकल्पित विसर्गाने पाणी पोहोचू शकत नाही.

(४) कालव्याचे ० ते ७२ कि.मी. मधील अस्तरीकरणाची निविदा झाली असून, सदर निविदेअंतर्गत १६ कि.मी. लांबीतील अस्तरीकरण पूर्ण झाले आहे. उर्वरित काम निधी अभावी होऊ शकले नाही. कालव्याचे अस्तरीकरण करण्यासाठीची तरतूद तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावात केली असून, त्यास मान्यता प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. तसेच गळती कमी करण्यासाठी विशेष दुरुस्ती अंतर्गत अंदाजपत्रके मंजूरीस्तव सादर करण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौ.शिरजगाव कसबा (ता.चांदुर बाजार, जि.अमरावती) येथील बांधी नाल्यावरील प्रस्तावित लघु प्रकल्पाचे काम कार्यान्वित करणेबाबत

**(५१) * १४१९२१ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.शिरजगाव कसबा (ता.चांदुर बाजार, जि.अमरावती) येथील बांधी नाल्यावरील प्रस्तावित लघु प्रकल्पाचे सविस्तर संकलन व सर्वेक्षण करण्यात यावे अशी मागणी लोकप्रतिनिधींनी उपविभागीय अधिकारी पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण उपविभाग क्र. १ अमरावती यांचेकडे दिनांक १८ जून, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बांधी नाल्यावर छिंदवाडी लघु पाटबंधारे योजना प्रकल्पाचे सर्वेक्षण अन्वेषण तसेच अंदाजपत्रक तयार असल्याचे वा सदर योजना अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अमरावती यांचेमार्फत राबविण्यात येत असल्याचे उपविभागीय अधिकारी पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण उपविभाग क्र.१ अमरावती यांनी दिनांक २५ जून, २०१८ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्प तात्काळ कार्यान्वित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजीराव सावंत :** (१), (२) व (३) छिंदवाडीचे अंदाजपत्रक तयार करुन योग्य ती कार्यवाही करण्याबाबतचे मा.लोकप्रतिनिधींचे दिनांक २६.९.२०१८ चे निवेदन प्राप्त झाले आहे.

ल.पा योजना छिंदवाडीचा पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्रस्ताव दिनांक ३१.१२.२०१८ च्या पत्रान्वये मुख्य अभियंता, जलविज्ञान व नियोजन (जलसंपदा विभाग), नाशिक यांना सादर केला असून सदर प्रस्तावावर उपस्थित करण्यात आलेल्या त्रुटींची पुर्तता करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जांभा (ता.मुर्तिजापूर, जि.अकोला) येथील शेतकऱ्यांच्या संपादीत केलेल्या जमिनीचा मोबदला एकसमान अदा करणेबाबत

**(५२) * १३५६११ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जांभा (ता.मुर्तिजापूर, जि.अकोला) येथील काटेपूर्णा बॅरेज प्रकल्पासाठी जमिन खरेदी करुन शासनाने ताब्यात घेतली असून त्यापैकी काही

शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीची किंमत १ लाख ४० हजार रुपये व काही शेतकऱ्यांना ९ लाख रुपये एकराप्रमाणे मोबदला दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही शेतकऱ्यांच्या जमिनीला कमी किंमत व काही शेतकऱ्यांच्या जमिनीला जास्त किंमत देण्यात आली असल्याने सर्वच शेतकऱ्यांनी ७ लाख ६० हजार रुपये एकराप्रमाणे जमिनीची किंमत देण्यात यावी असे निवेदन मुर्तिजापूर येथे उपविभागीय अधिकाऱ्यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्पबाधीत सर्व शेतकऱ्यांना जमिनीची किंमत सारख्या प्रमाणात देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय. काटेपुर्णा प्रकल्पाचे बुडीत क्षेत्राकरीता जांभा बु. शिवारातील सन २००९-१० मध्ये सरळ खरेदीने संपादीत केलेल्या जमिनीसाठी रू.१.३० लक्ष ते २.१७ लक्ष प्रति एकर दर होता.याच गावातील जमिनीसाठी भुसंपादन कायदा २०१३ नुसार निवाडा दिनांक २७/०५/२०१६ रोजी पारित निवाडयानुसार मोबदल्याची रक्कम ९.५७ लक्ष प्रति एकर ते १०.२२ लक्ष प्रति एकर इतकी आहे.

(२) नाही, असे कोणत्याही प्रकारचे निवेदन उपविभागीय कार्यालयास सन २०१९ या वर्षामध्ये प्राप्त झाले नाही. मात्र काही कास्तकरांनी वाढीव रकमाच्या मागण्या केल्या आहेत.

(३) सन २००९-१० मध्ये जमिनीची थेट खरेदी केली असल्यामुळे वाढीव रकमाच्या मागण्या मान्य करता येणार नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कशेळी सावरेवाडीत (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) लघुपाटबंधारे विभागाने बांधलेले धरण वापराविना पडून असल्याबाबत

**(५३) * १३६०४६ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कशेळी सावरेवाडीत (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) सुमारे ३० ते ३५ वर्षापूर्वी लघुपाटबंधारे विभाग स्थानिक स्तराकडून लाखो रुपये खर्च करुन बांधण्यात आलेले धरण वापराविना पडून असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त धरणाला नियोजित कालवे न काढल्याने या धरणातील पाण्याचा पिण्यासाठी व शेतीसाठी उपयोग होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजीराव सावंत :** (१) व (२) नाही हे खरे नाही.

कशेळी ल.पा. योजना ता.राजापूर जि.रत्नागिरी या योजनेच्या धरणाचे काम सन २००१ मध्ये पूर्ण करण्यात आले असून सदर योजनेचा उजवा कालवा १.७५ कि.मी. लांबीचा असून डावा कालवा ६.१२ कि.मी. लांबीचा आहे. सदर कालव्यांची कामे सन २०१४ मध्ये पूर्ण करण्यात आली आहेत. योजनेच्या जलाशयातून व उजव्या व डाव्या कालव्यांद्वारे १५७ हेक्टर सिंचन क्षेत्र सिंचनासाठी उपलब्ध आहे. सद्यस्थितीत कशेळी गावातील ग्रामस्थ धरणातील पाण्याचा वापर खरीप हंगामातील पिके व आंबा बागायतीच्या सिंचनासाठी करतात.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डोंगरखंडाळा (ता.जि.बुलढाणा) येथील चांभारतोंड्या नाल्या लगत नवीन पाझर तलाव मंजूर करणेबाबत

**(५४) * १३५०४१ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंगरखंडाळा (जि.बुलढाणा) येथील चांभारतोंड्या नाल्या लगतच्या ई-क्लास जागेवर नवीन पाझर तलाव मंजूर करणेबाबतच्या सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले असल्याचे दिनांक ३१ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वेक्षणाच्या अनुषंगाने उक्त पाझर तलाव मंजूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजीराव सावंत :** (१) व (२) सदर प्रकरणी प्राथमिक सर्वेक्षण जिल्हा परिषद, मृद व जलसंधरण विभाग, बुलढाणा मार्फत करण्यात आले आहे. त्यामध्ये सदर तलावाची सिंचन क्षमता १०० हेक्टरपेक्षा जास्त असल्याचे आढळून आल्याने त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पेण (जि.रायगड) तालुक्यातील माचेला-चिर्बी समुद्र संरक्षक बंधा-याचे दुरुस्ती व पुर्नबांधणीचे काम पुर्ण करणेबाबत

**(५५) * १३९९९५ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **खारभूमी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पेण (जि.रायगड) तालुक्यातील माचेला-चिर्बी समुद्र संरक्षक बंधारा हा समुद्राच्या उधाणाच्या पाण्यामुळे फुटल्यानंतर मागील ३ वर्षापासून या परिसरातील ११ गावांतील २७०० हून अधिक एकर भातशेतीत खारे पाणी शिरल्याने भातशेतीची जमीन नापीक झाल्यामुळे ५०० पेक्षा जास्त शेतकरी कुटुंबे बाधित झाली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू बाधित ११ गावांतील ५०० हून अधिक शेतकऱ्यांनी माचेला-चिर्बी संरक्षक बंधाऱ्याच्या दुरूस्तीचे / पुर्नबांधणीचे काम विनाविलंब पूर्ण करण्यात यावे अशा आशयाच्या मागणीचे एक निवेदन कार्यकारी अभियंता, खारभूमी विकास विभाग व जिल्हाधिकारी, रायगड याच्यांकडे मागील ३ वर्षापासून सातत्याने सादर केलेले असुनही आजमितीस शासनाकडून सदरहू मागणीबाबत दिरंगाई झाल्यामुळे सदरहू ११ गावांतील जमिन बचाव संघर्ष कृती समितीने जिल्हाधिकारी, रायगड यांना एक सविस्तर निवेदन सादर करून सदरहू बंधाऱ्याच्या मागणीबाबत खारे पाणी रोखण्याचे आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माचेला-चिर्बी समुद्र संरक्षक बंधाऱ्याच्या दुरूस्तीचे तथा पुर्नबांधणीचे काम सुरु करण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, माचेला-चिर्बी समुद्र संरक्षक बंधाऱ्याचे काम विनाविलंब पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) अंशत: खरे आहे.

माचेला चिर्बी या शासकिय खारभूमी योजनेच्या खाडीतून खारे पाणी जाऊन ११ गावांतील सुमारे १५०० एकर क्षेत्र बाधित झाले आहे.
(२) अंशत: खरे आहे.

सदर योजनेच्या खाडीचे बांधकाम दि.०५/०४/२०१९ रोजी हाती घेण्यात आले होते. परंतु काही स्थानिक गावकऱ्यांच्या विरोधामुळे सदर काम पूर्ण होऊ शकले नाही. सदर काम पुन:श्च सुरु करणेकरीता ११ गावांतील जमिन बचाव संघर्ष कृती समितीने आंदोलनाचे निवेदन सादर केले होते.

तथापि, तद्पूर्वीच काम पुन:श्च हाती घेतल्याने सदर आंदोलन रद्द करण्यात आले.
(३) माचेला-चिर्बी समुद्र संरक्षक बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे तथा पुनर्बांधणीचे कामास स्थानिक शेतकऱ्यांच्या विरोधामुळे विलंब झाला आहे.
(४) काही स्थानिकांचा कामाला विरोध होता. मा.मंत्री, खारभूमी विकास यांनी सदर ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन स्थानिकांशी चर्चा केली होती. आता या ठिकाणी काम सुरु करण्यात आले असून सद्य:स्थितीत बहुतांश बांध दुरुस्तींचे व तीन खांडीचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित काम जून, २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुऱ्हा वढोदा (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) येथील उपसा सिंचन योजनेस निधी मंजूर करणेबाबत

**(५६) * १४१४०७ श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुऱ्हा वढोदा (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) येथील उपसा सिंचन योजनेस वाढीव निधी मंजूर करणेसाठी मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव यांच्या समवेत लोकप्रतिनिधींसह सर्व संबंधितांची दिनांक ११ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास बैठक झाली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बैठकीत ठरल्याप्रमाणे अद्याप कोणतीच कार्यवाही विभागाकडून झाली नसल्याने लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ मे, २०१९ रोजीच्या पत्रान्वये सत्वर कार्यवाही करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कुऱ्हा वढोदा उपसा सिंचन योजनेस निधी टीआयडीसी व व्हीआयडीसी या महामंडळाकडून किती दिवसात वाढीव निधी मंजूर करणार आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.
(२) होय.
(३) कु-हा वढोदा उपसा सिंचन योजनेच्या कामास सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार
तापाविम - १७.५० कोटी
विपाविम - १५.०० कोटी
एकुण - ३२.५० कोटी एवढी तरतूद करण्यात आली असुन कु-हा वढोदा उपसा सिंचन योजनेच्या धरण, उपसा सिंचन योजना व वितरण व्यवस्थेच्या बांधकामास आवश्यकतेनुसार वाढीव निधीची मागणी करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे आळते व मौजे घोसरवाड (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील रोपवनाच्या कामामध्ये झालेला गैरव्यवहार

**(५७) * १४१५१८ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.आळते व मौ. घोसरवाड (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथे झालेल्या रोपवनाच्या कामामध्ये करवीरचे तत्कालिन वनक्षेत्रपाल श्री.व्ही.बी.जाधव व हातकणंगलेचे तत्कालिन वनपाल श्री.वसंत ब.चव्हाण यांनी सुमारे ३३ लाखांचा गैरव्यवहार केल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार याप्रकरणात दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) अशी तक्रार एप्रिल, २०१९ मध्ये निदर्शनास आलेली नाही. तथापि, दि. ७.१२.२०१७ रोजी एका वृत्तवाहिनीवर अशा स्वरुपाची बातमी प्रसिध्द झाली होती.

(२) व (३) वृत्तवाहिनीवर प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने विभागीय वन अधिकारी (भूमी व कॅम्पा), कोल्हापूर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली. सदर चौकशीमध्ये प्रथमदर्शनी अनियमीतता आढळल्यानुसार श्री.व्ही.बी.जाधव, तत्कालीन वन क्षेत्रपाल, करवीर, श्री.वसंत ब. चव्हाण, तत्कालीन वनपाल, हातकणंगले, श्री.मा.अ. ढेरे, तत्कालीन वनरक्षक, हातकणंगले व श्रीमती सु.स. मदने, तत्कालीन वनरक्षक, तमदलगे यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली असून दोषारोप पत्र बजावण्यात आले आहे. विभागीय चौकशीची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील वनविभागाकडून रोजगार हमी योजनेंतर्गत झालेला गैरव्यवहार

**(५८) * १३७५५७ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील वनविभागाकडून रोजगार हमी योजनेंतर्गत वनतलाव, तलावाचीउंची, गालभरणी, पिचिंग, दबाई, सांडवा इत्यादी कामे स्थानिक मजुरांकडून करून घेण्याऐवजी ठेकेदार व अधिकारी यांनी सदरची सर्व कामे मशिनरीच्या सहाय्याने करून खोटे मजूर हजेरीपटावर दाखवून शासनाची दिशाभूल केल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार कंत्राटदार व वनविभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) हे खरे नाही,

या संदर्भात आपले सरकार पोर्टलवर दि.०१.०४.२०१९ रोजी तक्रार प्राप्त झालेली आहे.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली असता अशा प्रकारची घटना शहापूर वन विभागात निदर्शनास आलेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हयातील गाडे वस्ती (ता.आंबेगांव) व धोलवड (ता.जुन्नर) येथे मानवी वस्तीत बिबट्याने केलेले हल्ले

**(५९) * १३६२६७ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेगांव (जि.पुणे) तालुक्यातील साकोरे हद्दीतील गाडे वस्तीत बिबट्याने केलेल्या हल्यात पाच वर्षाच्या बालिकेचा मृत्यू झाला असल्याची घटना दिनांक २४ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) तसेच धोलवड (ता.जुन्नर, जि.पुणे) गावात एका बिबट्याने रात्रीच्या वेळेस घराबाहेर झोपलेल्या कुटुंबावर हल्ला केल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार मृत पावलेल्या बालिकेच्या कुटुंबियांना व जखमी झालेल्या व्यक्तींना आर्थिक मदत करण्यासह भविष्यात मानवी वस्तींवर बिबट्यांचे हल्ले होऊ नयेत यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) साकोरे (गाडेपट्टी) येथे दिनांक २४.०३.२०१९ रोजी सायंकाळी श्रीमती कुसूम कडुसकर व त्यांची नात कु.श्रुती थिटे (वय ५ वर्ष) ही गुरांसाठी गवत कापून आणण्यासाठी गेली असता बिबट्याने बालिकेवर हल्ला केल्याने तीचा मृत्यू झाला आहे.
(२) मौजे धोलवड, ता.जुन्नर, जि.पुणे येथे दिनांक १९.०४.२०१९ रोजी पहाटे कु.ज्ञानेश्वर दिलीप माळी (वय दिड वर्ष) यास बिबट्याने हल्ला करुन जखमी केल्याची घटना निदर्शनास आली आहे.
(३) व (४) साकोरे (गाडेपट्टी) येथे मृत कु.श्रुती हिच्या कायदेशीर वारसास प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार रु. १५.०० लक्ष अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

मौजे धोलवड, ता.जुन्नर, जि.पुणे येथे बिबट्याच्या हल्ल्यात जखमी झालेल्या कु.ज्ञानेश्वर दिलीप माळी याच्यावर प्राथमिक उपचार पूर्ण झाल्यावर त्यास रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे.

मानव व वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या दृष्टीकोनातून खालीलप्रामणे उपाययोजना करण्यात येतात:-

• वन्यप्राणी प्रवण क्षेत्रात वन कमचाऱ्यामार्फत गस्त घालण्यात येवून वन्यप्राण्यांना मानवी वस्तीपासून दूर ठेवण्यात येते.

• स्थानिक लोकांमध्ये बिबट वा इतर वन्यप्राण्यांपासून घ्यावयाची काळजी याबाबत वेळोवेळी जनजागृती करण्यात येते.

• वन कर्मचारी व स्थानिक लोक यांच्या सहभागातून जलद बचाव पथकांची निर्मिती करण्यात आली आहे.

• जुन्नर वन विभागातील बिबट या वन्यप्राण्यांची संख्या, संख्येची गतिशिलता व हालचाली समजून घेणे याबाबतचे संशोधन / अभ्यास प्रकल्प भारतीय वन्यजीव संस्था, देहरादून यांचेमार्फत सुरु आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## कळंबुसरे (ता.उरण, जि.रायगड) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील मुलींसोबत झालेले गैरवर्तन

**(६०) * १४१४८८ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंबुसरे (ता.उरण, जि.रायगड) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील मुलींवर स्थानिक शालेय शिक्षण समितीच्या सभापतीने लैंगिक अत्याचार केल्याचे दिनांक १७ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पिडीत मुलीच्या पाल्यांना आरोपीकडून दमदाटी करण्यात येत असल्याने याप्रकरणी आरोपीवर कारवाई करण्यासाठी ग्रामस्थ आणि पाल्यांनी शाळेच्या मुख्याध्यापकांना घेराव घातला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार बेजबाबदार शाळा प्रशासनावर व संबंधीत दोषींवर पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करुन कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अशी बाब नाही.

(३) व (४) सदर प्रकरणी चौकशी सुरू आहे.

आरोपीवर पोलीस स्टेशन, उरण येथे भादंसं १८६० अन्वये कलम ३५४, भादंसं १८६० अन्वये कलम ५०६, बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम, २०१८ कलम ८, १२ अन्वये दि.१६.४.२०१९ रोजी गुन्हा दाखल केला आहे.त्यानुसार व्यवस्थापन समिती अध्यक्ष यांना अटक केली आहे. दि.२०.०४.२०१९ रोजीच्या सभेमध्ये संबंधितास पदच्युत करण्यात आले.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परतवाडा (जि.अमरावती) शहरात अंजनगाव मार्गावरील गळी परिसरात उभारण्यात आलेल्या सिमेंट मिक्सिंगप्लँटबाबत

**(६१) * १४१९४८ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील परतववाडा ते अकोट, परतवाडा ते बैतुल या दरम्यान सुरु असलेल्या चौपदरीकरणाचे काम खुराना कंन्स्ट्रशनमार्फत सुरु असून या कंपनीचा परतवाडा शहरात अंजनगाव मार्गावरील तोफनाल्या समिप गौरखेडा कुंभी ग्रामपंचायत हद्दीतील गळी परिसरात उभारण्यात आलेल्या सिमेंट मिक्सिंगप्लँटसाठी कुठलीच परवानगी न घेता उभारण्यात आल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सिमेंट मिक्सिंगप्लँटमुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार या अनधिकृत मिक्सिंगप्लँटवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

ग्रामपंचायत गौरखेडा कुंभी अंतर्गत मौजा औरंगपूर येथे सर्व्हे ने. ०६ श्री. विष्णू रामसहाय उपाध्याय यांच्या मालकीच्या शेतामध्ये सिमेंट काँक्रीटीकरण प्लँट सुरू असून या प्लँट करीता ग्रामपंचायतीची कोणतीही परवानगी घेतलेली नाही.

(२) याबाबत नागरिकांचे प्लँट बंद करण्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त नाही.
(३) ग्रामपंचायतीने दि. २१/०२/२०१९ रोजी सिमेंट प्लँट बंद करण्याबाबत नोटीस देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पिंपरी चिंचवड (जि.पुणे) उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने जप्त केलेल्या वाहनांचे लिलाव वेळेत होत नसल्याबाबत

**(६२) * १४१८५८ श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी चिंचवड (जि.पुणे) उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने पथकर थकवलेल्या व महसूल कागदपत्राची पूर्तता न केलेली वाहने जप्त केली असून त्या वाहनांच्या सुट्ट्या भागांची चोरी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जप्त केलेल्या वाहनांचा लिलाव वेळेत होत नसल्याने अशा चोरीच्या घटना घडत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :**(१) नाही.
(२) वायुवेग पथकाद्‌वारे मोटार वाहन कायदा व महाराष्ट्र मोटार कर कायदा अंतर्गत अटकावून ठेवलेल्या वाहनांचा लिलाव दि.२९.०३.२०१९ रोजी निश्चित करण्यात आला होता. तथापि, लोकसभा सार्वत्रिक निवडणूकांची आदर्श अचारसंहिता लागू झाल्याने सदर लिलाव प्रक्रिया दि.११.०७.२०१९ रोजी ठेवण्यात आली आहे.
(३) व (४) थकीत कर अथवा शासकीय येणे रक्कमाबाबत जप्त करण्यात आलेल्या वाहनांची लिलावाद्‌वारे विक्री करुन शासनाचा महसूल संवर्धन

करण्याकरिता अवलंबवयाची लिलाव प्रक्रियेची कार्यपद्धती परिवहन आयुक्त कार्यालयाने दि.०३.०५.२०१९रोजीच्या पत्रान्वये क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे शहरालगत असलेल्या येऊर परिसरात पर्यटन प्रकल्प कार्यान्वित करणेबाबत

**(६३) * १३६१३४ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येऊर (जि.ठाणे) परिसरात पर्यटन केंद्र विकसित करण्याचा प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी दिनांक ५ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.वनेमंत्री यांचे समवेत सर्वसबंधितांची बैठक आयोजित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बैठकीमध्ये कोणते निर्णय घेण्यात आले,

(३) असल्यास, अनेक वर्षे प्रलंबित असलेले येऊर पर्यटन प्रकल्प तात्काळ कार्यान्वित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) दिनांक ०५ डिसेंबर, २०१८ रोजी व त्यासुमारास मा. मंत्री (वने) यांचे समवेत सदर प्रकल्पा संदर्भात बैठक आयोजित करण्यात आली नाही.

(३) व (४) येऊर पर्यटन प्रकल्पाकरिता आवश्यक असलेल्या जमिनीकरिता वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत प्रस्ताव क्षेत्रीय स्तरावर प्राप्त झाला असून, प्रस्तावामध्ये काही त्रुटी आढळून आल्याने सदर त्रुटींची पूर्तता करणेबाबत कार्यकारी अभियंता, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांना क्षेत्रिय कार्यालयाने कळविले आहे.

-----------------

## चकडोह व बाजारगांव (ता.काटोल, जि.नागपूर) येथील टायगर कॉरीडोर वनजमीन सोलर इंडस्ट्रीज इंडिया लिमिटेडला दिल्याबाबत

**(६४) * १३७८६१ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चकडोह व बाजारगांव (ता.काटोल, जि.नागपूर) येथील टायगर कॉरीडोर ची एकुण वनजमीनी पैकी ८८ हे.जमिन सोलर इंडस्ट्रीज इंडिया लिमिटेडला बाजारमुल्यापेक्षा कमी दरात दिल्याची बाब माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्याघ्र प्रकल्पाच्या दृष्टीने टायगर कॉरीडोर ची जमीन सदर इंडस्ट्रीला दिल्यामुळे व्याघ्र प्रकल्प होण्यास अडथळे निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जमीनीचे बाजार मुल्य ५० कोटी पेक्षा अधिक असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) मे.सोलर इंडस्ट्रिज इंडिया लि. यांना स्फोटके निर्मितीच्या कारखान्याच्या विस्तारीकरणासाठी ८७.९७ हेक्टर वनजमीन वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळती करण्यास केंद्रीय पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालयाने दि.१७.१२.२०१८ रोजी अंतिम मान्यता प्रदान केली आहे. त्यानुषंगाने राज्य शासनाने दि.१५.०४.२०१९ रोजी सदर वनजमीन

वळतीकरणाचे आदेश निर्गमित केले आहेत. सदर मंजूर क्षेत्रापैकी ८३.२४ हे. क्षेत्र सुरक्षा कवच (Safety Distance Zone) असून ४.७३ हे. क्षेत्रावर वनेतर कामे प्रस्तावित आहेत. सदर वनजमीन वनेतर प्रयोजनासाठी वळती करतेवेळी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या सूचनेनुसार निश्चित केलेल्या दराने वनजमिनीचे नक्त वर्तमान मूल्य वसूल करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही. मे.सोलर इंडस्ट्रिज इंडिया लि. यांना मंजूर करण्यात आलेले ८७.९७ हे. क्षेत्र प्रादेशिक वनविभागाच्या अखत्यारितील आहे. सदर क्षेत्रापासून बोर व्याघ्र प्रकल्प १५ कि.मी. तर पेंच व्याघ्र प्रकल्प ३६ कि.मी. दूर आहे.

(३) प्रकल्प यंत्रणेकडून केंद्र शासनाच्या प्रचलित धोरणानुसार वळती करण्यात आलेल्या वनक्षेत्राचे नक्त वर्तमान मूल्य (Net Present Value) रू. ७०९.८५ लक्ष वसूल करण्यात आले आहे. प्रकल्प यंत्रणेने याव्यतिरिक्त ८८ हे. पर्यायी वनेतर क्षेत्र वन विभागास हस्तांतरीत केले असून पर्यायी वनीकरणासाठी रू.६१९.९२ लक्ष व चेनलिंक कुंपनाकरीता रू.७८.२६ लक्ष निधी शासनाकडे जमा केला आहे. वन्यजीव विषयक संरक्षण व उपाययोजनांच्या अनुषंगाने कोंढाळी व कळमेश्वर वनपरिक्षेत्रातील वन्यजीवांच्या संरक्षण व संवर्धनासाठी उपाययोजनांकरिता केंद्र शासनाच्या दि.२०.०५.२०१९ रोजीच्या आदेशानुसार प्रकल्प यंत्रणेस रू.१०० लक्ष निधी वन विभागाकडे जमा करणे बंधनकारक आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बाभूळगाव (जि.यवतमाळ) ग्रामपंचायतीच्या लाभार्थी प्रतीक्षा यादीत झालेला गैरव्यवहार

**(६५) * १३७४५१ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाभूळगाव (जि.यवतमाळ) ग्रामपंचायतीच्या प्रतीक्षा यादीत जुन्या लाभार्थ्यांना वगळून यादीत नावे नसलेल्या चार जणांना सिंचन विहीर वाटपाचा लाभ दिल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून कारवाई करण्याची मागणी उमरी-उमर्डा ग्रामपंचायतीच्या माजी सरपंचांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, त्यानुसार संबंधीत दोषी अधिकारी व बनावट लाभार्थ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयदत्त क्षीरसागर :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) त्याबाबत विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती, बाभुळगांव यांनी चौकशी करुन अहवाल गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बाभुळगांव यांच्याकडे सादर केला आहे. त्यानुसार सदर प्रकरणी तत्कालीन ग्रामसेवक यांना कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयातील पांढरकवडा पंचायत समितीत रोजगार हमी योजनेंतर्गत करण्यात आलेल्या कामात झालेला गैरव्यवहार

**(६६) * १३७२६६ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हयातील पांढरकवढा पंचायत समिती अंतर्गत ४० गावामध्ये रोजगार हमी योजने अंतर्गत करोडो रूपयांची सिमेंट काँक्रीटच्या नाल्यांची अनेक कामे सुरू असून या कामावर कागदोपत्री मजुरांची नावे हजेरीपटावर दर्शविण्यात आली असून कुशल व अकुशल कामाची कागदोपत्री अहवाल तयार करून कोटयवधी रूपयांची देयके मंजूर करण्यात आली असल्याचे दिनांक २८ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामे कागदोपत्री रोजगार हमी योजनेंतर्गत करण्यात आलेली असल्याचे दर्शविण्यात आले असले तरी प्रत्यक्षात ही सर्व कामे कंत्राटदाराच्या मार्फतीने करण्यात येऊन कोट्यवधी रूपयांचा गैरव्यवहार करण्यात आले असल्याची तक्रार जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्याकडे करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयदत्त क्षीरसागर :** (१) व (२) हे खरे नाही, तथापी अशा आशयाची तक्रार प्राप्त झाली आहे.
(३) सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी पांढरकवडा यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे. संबंधित सर्वकष चौकशीची प्रक्रिया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रावेर (जि.जळगांव) वनविभागातील सातपुडा पर्वतामध्ये होत असलेली वृक्षतोड व लाकूड तस्करीबाबत

**(६७) * १४०४४१ श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रावेर (जि.जळगांव) वनविभागातील सातपुडा पर्वतामध्ये खूप मोठ्या प्रमाणात वृक्ष तोड व लाकूड तस्करी होत असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लाकूड तस्करी ही वन विभागातील काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार वृक्षतोड व लाकूड तस्करी करण्या-या संबधितावर कारवाई करण्यासह सदर प्रकार रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) यावल वनविभागाच्या रावेर वनपरिक्षेत्रातील सातपुडा पर्वतामध्ये खुप मोठया प्रमाणात वृक्षतोड व लाकूड तस्करी होत असल्याचे माहे मे, २०१९ वा त्यादरम्यान निदर्शनास आले नाही.

(२) तस्करीच्या घटना निदर्शनास आल्या नसल्याने अधिकारी/कर्मचारी यांचे संगनमताने घटना होत असल्याचा प्रश्न निर्माण होत नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे वडद व साखरी बुद्रुक (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) या गावांत पाझर तलावासाठी जमिनी घेवून काम न केल्याने ७/१२ वरील नोंदी रद्द करणेबाबत

**(६८) * १३८८०४ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वडद व साखरी बुद्रुक (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) या गावांत सन १९८३ साली पाझर तलाव मंजूर करण्यात आले तथापि मागील ३६ वर्षात पाझर तलावांच्या कामांसाठी शासनाने निधीच मंजूर केला नसल्याने ७/१२ वर करण्यात आलेल्या नोंदी रद्द करण्यात याव्यात अशी मागणी पाझर तलावांसाठी जमिनी देणाऱ्या शेतकऱ्यांनी माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान गुहागर पंचायत समितीच्या आमसभेमध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार शेतक-यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजीराव सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) मौजे वडद ता.गुहागर येथील पाझर तलावास जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडील सर्वसाधारण ठराव क्र. १८२६ दि.१४/०८/१९९० अन्वये रु.६.१२ लक्ष च्या कामास प्रशासकीय मान्यता प्राप्त होऊन या पाझर तलावाचे काम सन १९९२ मध्ये जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून पुर्ण करणेत आलेले आहे. तसेच साखरी बु. येथील पाझर तलावाचे काम रोजगार हमी योजनेतून मंजूर झाले असून या पाझर तलावाच्या पायाकडील जलरोधी खंदकाची खोदाई व पुनर्भरणाचे काम करण्यात आलेले असून अपूर्णावस्थेत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या ७/१२ वर करण्यात आलेल्या नोंदी रद्द करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील अरुणा मध्यम प्रकल्पाचे काम संपूर्णत: बंद झाल्याबाबत

**(६९) * १४०११५ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील अरुणा मध्यम पाटबंधारे प्रकल्पासाठी शासनाने १३ वर्षापुर्वी ५४ कोटी रुपयांच्या अंदाजितखर्चाच्या कामास प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर सदरहू प्रकल्पाचे काम सुरु झाले असुन काही कालांतराने सदरहू काम संपूर्णत: बंद झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अरुणा मध्यम प्रकल्पामुळे १९ गावांतील ५ हजार ३१० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार असून प्रकल्पाचे काम प्रलंबित असल्यामुळे एकीकडे तेथील शेतकऱ्यांना सिंचनापसून वंचित रहावे लागले आहे तर दुसरीकडे या प्रकल्पास होत असलेल्या विलंबामुळे मुळ ५४ कोटी रुपये अंदाजित खर्चाच्या या प्रकल्पावर आतापर्यंत १ हजार ३ कोटी रुपये खर्च झाले असुन या प्रकल्पाला सन २०१८ मध्ये पंतप्रधान कृषी संचायी योजनेतून १ हजार ६०० कोटी रुपये निधीची सुधारीत मान्यता मिळून निधीही प्राप्त झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदरहू प्रकल्पाचे काम तात्काळ कार्यान्वित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे. शासन निर्णय क्रमांक अरुणा-१०८५/(२०९/८६)-जसंअ मंत्रालय मुंबई दि.५/१२/१९९५ अन्वये प्रकल्पास रु.५३.९४ कोटी रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

जुन २००४ ते मे २००७ या कालावधीमध्ये प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे काही कालावधीसाठी काम बंद होते व उर्वरीत वेळेत उपलब्ध निधीनुसार काम प्रगतीपथावर होते.

(२) नाही. शासन निर्णय क्रमांक सुप्रमा/२०१७/११३०/ (३२४/१७)/मध्यम प्रकल्प, मुंबई, मंत्रालय, मुंबई दिनांक ०३/११/२०१८ अन्वये प्रकल्पाचा रु.१६८९.५० कोटी रक्कमेस तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान झाली आहे.

प्रकल्पाचे प्रथम टप्पा घळभरणीचे काम माहे मे २०१९ अखेर पूर्ण करुन ४८.०६ द.ल.घ.मी पाणीसाठा निर्मित केला आहे. माहे जून २०२० पर्यंत प्रकल्पाचा संकल्पित पाणीसाठा ९३.३७८ द.ल.घ.मी व सिंचन क्षेत्र (ICA) ५३१० हेक्टर निर्मिती करणेचे उद्यिष्ट आहे.

या प्रकल्पावर माहे मार्च २०१९ अखेर १००७.४४ कोटी तसेच माहे मे २०१९ अखेर एकूण रू.१११८.३७ कोटी खर्च झाले आहे. सन २०१९-२० साठी सदर प्रकल्पास रु. २५० कॊटी निधीची तरतुद मंजूर करण्यात आली आहे.

उजवा कालवा व भुईबावडा शाखा कालवा वरील २२८४ हेक्टर क्षेत्राचे नलिका वितरण प्रणालीचे काम प्रगतीपथावर आहे. डावा कालवा कि.मी १ ते १३ मधील मातीकाम व बांधकामे प्रगतीपथावर आहेत. मांगवली शाखा कालवा व डावा कालवा कि.मी १३ ते २३ मधील नलिका वितरण प्रणालीचे संकल्पन प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील अर्जुना नदी काठावरील गावांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी तयार केलेल्या आराखड्याबाबत

**(७०) * १३६०८४ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील पर्यटन व कृषि क्षेत्राच्या माध्यमातून अर्जुना नदी काठावरील गावांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शासनाने तयार केलेला सुमारे १०९ कोटी ९४ लाख ५० हजारांचा आराखडा मागील दोन वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजीराव सावंत :** (१), (२), (३) व (४) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, रत्नागिरी यांचेकडील अर्जुना नदी पुनर्जीवन संदर्भात रू.१०९ कोटी ९४ लाख ५० हजार चा प्रस्ताव प्राप्त झाला होता. तदनंतर याबाबतचा रू.५.०२ कोटीचा सुधारीत प्रस्ताव शासनास प्राप्त झाला. त्यास अनुसरून शासनपत्र दि.१० ऑगस्ट, २०१७ अन्वये नदी पुनर्जीवन कार्यक्रमांतर्गत अर्जुना नदीवरील रू.२५०.०० लक्षच्या २५ सिमेंट नाला बंधाऱ्यांना तत्वत: मान्यता देण्यात आली आहे.

-----------------

## अलिबाग, मुरूड व रोहा (जि.रायगड) तालुक्यात असलेल्या धरणांची दुरुस्ती करणेबाबत

**(७१) * १४०९४९ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील बिडवागले (ता.अलिबाग), नांदगाव, फणसाड (ता.मुरूड) व धाटा (ता.रोहा) धरणाची दुरवस्था झाल्याने पाण्याची गळती होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त धरणांच्या गळतीमुळे या तालुक्यात पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त धरणांची शासनाने पाहणी केली आहे काय

(४) असल्यास, त्यानुसार या धरणांच्या दुरूस्तीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजीराव सावंत :** (१) अंशत: खरे आहे. फणसाड धरणाच्या विमोचकाच्या झडपद्वारावरील रबरसील नादुरुस्त झाल्याने अल्प प्रमाणात पाण्याची गळती होत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय.

(४) फणसाड धरणाच्या विमोचकामधील झपडद्वाराचे रबरसील दुरुस्त करण्याचे नियोजित आहे. तसेच रायगड जिल्हयातील बिडवागले धरणाची किरकोळ दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने दुरुस्तीची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.